रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १७८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४

किंमत ४ ₹

## विधिमंडळ नेतेपदी आदित्य ठाकरे

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विधानसभेतील गटनेतेपदी भास्कर जाधव यांची निवड करण्यात आली आहे. प्रतोदपदी पुन्हा एकदा सुनील प्रभू यांची निवड करण्यात आली. तर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या नेतेपदी आदित्य ठाकरे यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून आज नवनिर्वाचित २० आमदारांची बैठक बोलावण्यात आली. या बैठकीमध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आमदारांना पुन्हा एकदा आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला. आपण वीस असला तरी त्यांना पुरुन उरु, असा विश्वास ठाकरेंनी व्यक्त केला.

## पाच टन ड्रग्ज जप्त

**नवी दिल्ली :** भारतीय तटरक्षक दलाने सोमवारी (दि.२५) अंदमान आणि निकोबार बेटांजवळ बंगालच्या उपसागरात पाच टन ड्रग्ज घेऊन जाणारी बोट पकडली आहे. या बोटीचा वापर मासेमारीसाठी करण्यात येत होता. मात्र, यामधून इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. भारतीय तटरक्षक दलाने आतापर्यंत अंमली पदार्थाविरोधात केलेली ही सर्वात मोठी कारवाई आहे. तसेच इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्स सापडण्याचीदेखील ही पहिलीच वेळ असल्याची माहिती तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

घरातील प्रत्येकासाठी!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
Powered by Artificial Intelligence (AI)
Learn Basic to Advanced New Age Digital Skills
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

आजचा अग्रलेख
पस्तीस टक्क्यांची लढाई

# महिला सुरक्षा ऐरणीवर

## ॥ अत्याचार रोखण्यात पोलिसांना अपयश

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

महिला सुरक्षेसाठी सरकारने वेगवेगळ्या योजना राबविल्या. परंतु, महिला सुरक्षेचा प्रश्न आजही गंभीर असल्याची माहिती आकडेवारीनुसार दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रेवदंडा, मुरुड, पोयनाड, मांडवा सागरी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मागील दोन वर्षांमध्ये दीडशेहून अधिक महिलांवर अत्याचार झाल्याची माहिती आहे. त्यामध्ये विनयभंगाने शंभरी गाठली असून, अत्याचार पन्नाशीपर्यंत पोहोचल्याचे आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे.

रायगड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे. त्यामध्ये जिल्ह्यात औद्योगिकीकरण देखील झपाट्याने वाढत आहे. अलिबागसह अनेक ठिकाणी वेगवेगळे प्रकल्प येऊ लागले आहेत. त्यामुळे नागरीकरण देखील झपाट्याने वाढत आहे. या वाढत्या नागरीकरणामुळे महिला सुरक्षेचा प्रश्नदेखील गंभीर होऊ लागला आहे. मागील काही महिन्यांपूर्वी महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर सरकारने महिला सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली. रायगड पोलिसांनीदेखील त्याची अंमलबजावणी करून महिलांवर अत्याचार रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु, महिलांवरील अत्याचार कमी होत नसल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे.

मागील दोन वर्षांमध्ये अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३८, रेवदंडामध्ये २७, मुरूडमध्ये १४, रोहामध्ये ३९, पोयनाडमध्ये २४, मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३ महिलांवर अत्याचार झाले आहेत. त्यामध्ये १०९ विनयभंग व ४७ अत्याचाराची प्रकरणे असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे. यामध्ये अलिबाग, रोहा, रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलांवरील अत्याचार अधिक झाल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे. महिलांवर अत्याचार रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक योग्य ती पावले उचलण्यात यशस्वी ठरतील का, •> पान २ वर



| पोलीस ठाणे | विनयभंग | अत्याचार | चोरी | हाणामारी |
|---|---|---|---|---|
| अलिबाग | २१ | १८ | ५८ | २५ |
| रेवदंडा | २१ | ०६ | १८ | २४ |
| मुरुड | १० | १४ | १९ | १० |
| रोहा | २७ | १२ | ७८ | १४ |
| पोयनाड | १८ | ०६ | १३ | १८ |
| मांडवा सागरी | १२ | ०१ | १६ | १० |
| एकूण | १०९ | ४७ | २०२ | १०१ |

### नवीन सरकारने लक्ष द्यावे

सरकारने महिला सक्षमीकरण्यासाठी लाडकी बहीण योजना आणल्याचा गवगवा केला. या योजनेतून महिलांना उभारी मिळाली, असा दावा करुन सरकारने स्वतःचीच पाठ थोपटून घेतली. आता विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात नवीन सरकार स्थापन होण्याच्या हालचाली सुरु आहेत. त्यामळे महिल्यांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी सरकार सक्षम भूमिका घेईल का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# पुन्हा जोमाने काम करु

## शेकापचे बाळाराम पाटील यांचा निर्धार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

हो लढाई खऱ्या अर्थाने धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होती. परंतु, माझ्या सर्व कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र एक करुन प्रचार केला. जय-पराजयाने खचून न जाता पुन्हा एकदा नव्या जोमाने कामाला लागणार आणि उत्साहाने जनतेसमोर जाणार असा निर्धार पनवेल मतदारसंघाचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार बाळाराम पाटील यांनी केला.



विधानसभेच्या निकालानंतर बाळारामपाटीलयांनीकार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले की, माझ्यासोबत दुसऱ्या फळीतील तरुणांची फौज रस्त्यावर उतरून प्रचार यंत्रणा हातात घेऊन गावोगावी शिट्टी ही निशाणी पोहोचण्यात मग्न होती. पनवेलमधील अनेक समस्यांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला. अर्धवट केलेली विकास कामे, नैना प्रश्न, मालमत्ता कर यावर लक्ष दिले. मात्र, तरीही पराभव पत्करावा लागला. हार न मानता आपल्यावर ज्या १ लाख ३२ हजार ८४० मतदारांनी विश्वास टाकला आहे तो सार्थ ठरवण्यासाठी त्याच सर्व तरुण कार्यकर्त्यांची फौज घेऊन पुन्हा जोमाने काम करणार असल्याचे बाळाराम पाटील यांनी म्हणाले.

पनवेल १८८ विधानसभेत शेकाप आघाडीची २०१९ मध्ये ८७000+ मते असताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पनवेलमध्ये मुसंडी मारून महाविकास आघाडी, शेकाप आणि मित्र पक्षांच्या मदतीने शेतकरी कामगार पक्षाचा १ लाख ३२ हजार ८४० चा आकडा पार केला.

बाळाराम पाटील यांच्या विरोधात भाजपने •> पान २ वर

## वेधक

### 'अदानींवर चर्चा नको म्हणून सभागृह स्थगित'

**नवी दिल्ली :** सोमवारपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले. पण, पहिल्याच दिवशी दोन्ही सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. विरोधी पक्षाला अदानी प्रकरणावर चर्चा करायची होती म्हणून कामकाज तहकूब करण्यात आले, असा आरोप काँग्रेस नेते आणि खासदार शशी थरूर यांनी केला आहे. थरूर म्हणाले की, सर्व विरोधी पक्षांनी अदानी प्रकरणावर चर्चा करण्याची मागणी केली. पण, राज्यसभा आणि लोकसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. सरकार अदानीवर चर्चा करयला तयार नाही म्हणूनच सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले आहे, असे थरूर म्हणाले.

### दिल्ली सरकारकडून वृद्धांना मिळणार पेन्शन

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी सरकारने वृद्धांना पेन्शन देण्याची घोषणा केली आहे. दिल्ली सरकार ८० हजार वृद्धांसाठी नवीन वृद्धापकाळ पेन्शन सुरू करणार आहे. त्यामुळे दिल्लीतील ज्येष्ठ नागरिकांसाठी ही महत्त्वाची घोषणा आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी पेन्शनची घोषणा केली आहे. दरम्यान, या योजनेची घोषणा केल्यापासून गेल्या २४ तासांत दहा हजार अर्ज आले आहेत. त्यानुसार ६० ते ६९ वयोगटातील व्यक्तीला दरमहा दोन हजार रुपये दिले जातील. तर, ७० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या वृद्ध व्यक्तीला दरमहा अडीच हजार रुपये दिले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री आतिशी यांनी दिली.

### 'रश्मी शुक्लांकडून आचारसंहितेचा भंग'

**मुंबई :** निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर आयपीएस अधिकारी रश्मी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. आचारसंहितेच्या काळात त्यांनी गृहमंत्र्यांची भेट घेत आचारसंहितेचा भंग केला आहे. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेत त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे. ते म्हणाले की, तेलंगणामध्ये अशाच प्रकारे पोलीस महासंचालक व एका वरिष्ठ अधिकाऱ्याने वरिष्ठ मंत्र्याची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली होती. परंतु, भाजपाशासित राज्यात निवडणूक आयोग काहीही कारवाई करताना दिसत नाही, असा आरोपही लोंढेंनी केला आहे.

# आजपासून वरसोलीची यात्रा

## खाद्यपदार्थांसह वेगवेगळ्या वस्तूंची दुकाने सजणार





● अलिबाग जवळील वरसोली येथील विठ्ठल-रखुमाई मंदिर परिसरात मंगळवारपासून (दि. २६) यात्रा भरणार असल्याने आकाश पाळणे, टोराटोरा यासारखे पाळणे लावण्याच्या कामात कारागीर व पाळणे मालक व्यस्त आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

साजगावच्या यात्रेनंतर आता वरसोली येथील यात्रेचे वेध लागले आहेत. अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील आंग्रेकालीन विठ्ठल-रखुमाई देवस्थानच्या यात्रेला मंगळवारी (दि.२६) सुरुवात होणार आहे. रविवारपर्यंत पाच दिवस ही यात्रा सुरु राहणार असून, या कालावधीत लाखो भाविक दर्शनासाठी हजेरी लावणार आहेत. या पाच दिवसांत भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी यात्रा समितीसह पोलिसांमार्फत बैठक घेण्यात आले असून, सुरक्षेच्या दृष्टीनेदेखील नियोजन करण्यात आले आहे.

कार्तिकी एकादशीपासून यात्रेचा हंगाम सुरु होणार आहे. अलिबाग शहरालगत असलेल्या वरसोली यात्रेची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून आहे. मंगलमय व धार्मिक •> पान २ वर

## शेकाप कार्यकर्त्यांची बुधवारी बैठक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या अलिबाग, मुरूड, रोहा तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची सभा आयोजित करण्यात आली आहे. शेकाप सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि.२७) सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास पीएनपी नाट्यगृह येथे ही सभा होणार आहे.

विभागातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेकाप जिल्हा कार्यालयीन चिटणीस अजय झुंजारराव यांनी केले आहे.

# कार्यकर्त्यांनी खचू नये : स्नेहल जगताप

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड विधानसभा मतदार संघात झालेल्या पराभवाने कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये, असे भावनिक आवाहन ठाकरे गटाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांनी केले आहे. स्नेहल जगताप यांनी निवडणुकीच्या निकालानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधला. निवडणुकीतील झालेल्या पराभवाने कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये व आजपासूनच पुन्हा जोमाने कामाला लागून, पुन्हा मैदानात उतरुया, असे आवाहनही त्यांनी केले.



मतदारसंघातील जनतेसाठी मी पूर्वीप्रमाणेच ताकदीने उभी राहून त्यांच्या न्याय्य हक्कासाठी आणि विशेष करुन तरुणांच्या रोजगारासाठी हा माझा लढा सुरूच राहील. प्रत्येक क्षेत्रात यश-अपयश येतच असते आणि अपयश ही यशाची पहिली पायरी समजली जाते. त्यामुळे कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

विधानसभेच्या निवडणुकीत स्नेहल जगताप यांचा झालेला पराभव हा कार्यकर्त्यांना धक्कादायक ठरल्याचे महाडमध्ये सर्वत्र दिसून येत होते. सायंकाळी उशिरा शेकडो समर्थकांनी कॅप्टन निवास येथे जाऊन नानासाहेब जगताप व स्नेहल जगताप यांची भेट घेतली. याप्रसंगी महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख •> पान २ वर

# कार नदीत कोसळून दोन ठार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**




मुंबई-गोवा महामार्गावर वावे दिवाळी गावच्या हद्दीत सोमवारी (दि. २५) संध्याकाळी पाच वाजताच्या सुमारास महाड बाजूकडून मुंबई बाजूकडे जात असलेली मारुती सुझुकी सेलेरिओ गाडीला भीषण अपघात झाला. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने महामार्गावरून पुलाचा कठडा तोडून सुमारे २५ ते ३० फूट खोल नदीत खाली कोसळली. अपघातात एक महिला व पुरुष जागीच ठार झाला. हा अपघात एवढा भयंकर होता की, भरधाव येणारी कर नदीवरील पुलाच्या कठड्याला ठोकून हा कठडा तुटून पुलात आदळली. त्यावेळी गाडीच्या अपघाताने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. हा अपघात एवढा भीषण होता की गाडीचा पूर्णतः चक्काचूर झाला आहे.

गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी पुलाच्या खाली कोसळली असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली. मुंबई-गोवा महामार्गावर इंदापूर तीन कि.मी अंतरावर वावे दिवाळी गावच्या हद्दीत २५ नोव्हेंबर•> पान २ वर

# यंदा उत्कर्षनगर जाणार पाण्याखाली

## ॥ दिवसाढवळ्या राजरोसपणे भराव सुरू ॥ नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**। पेण । प्रतिनिधी ।**

गेली तीन वर्षे पेण नगरपालिकेवर प्रशासक असल्याने अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे, असा आरोप पेणकरांकडून करण्यात येत आहे. गेल्या पंधरा दिवसांपूर्वीच पेण अंतोरे रस्त्यावरील एका दुकान मालकाने झाडे तोडून, रस्ता दुभाजक फोडून दुकानात जाण्यासाठी रस्ता केला. त्याचप्रमाणे उत्कर्षनगरात दिवसाढवळ्या भराव करण्यात येत आहेत. त्यामुळे पाणी वाहून जाण्याचे नैसर्गिक नाले बंद होत आहेत. याकडे पालिका अधिकाऱ्यांचे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असून, यंदाच्या पावसाळ्यात पुन्हा उत्कर्षनगर पाण्याखाली जाईल, अशी भीती येथील



रहिवाशांना सतावत आहे.

याबाबत पेण नगरपालिकेचे बांधकाम अभियंता सुहास कांबळे यांना विचारणा केल्यावर त्यांनी नगरपालिकेच्या मालमत्तेचा नुकसान करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करणार असल्याचे सांगितले होते. परंतु, अद्यापतरी कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे पालिका अधिकारी अशा लोकांना पाठीशी तर घालत नाही ना, याबाबत शंका व्यक्त करण्यात येत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात उत्कर्ष नगरमध्ये दोन ते तीन वेळा नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरते. असे असतानादेखील पेण शहराच्या पूर्व भागात मोठ्या प्रमाणात भराव झाल्याने पारंपरिक पाणी वाहून जाणारे मार्ग बंद झाले आहेत. गेल्याच पावसाळ्यात चिंतामणी सोसायटीच्या शेजारील कास्प बिल्डींगच्या बाजूच्या मोऱ्या बांधकाम गृहनिर्माण बांधकाम करणाऱ्यांनी बंद केल्या होत्या, त्यामुळे उत्कर्षनगरमध्ये तीन दिवस पाणी भरलेले होते. शेवटी त्या मोरीत टाकलेला भराव काढल्याने पाण्याचा निचरा झाला. आत्ता तर रिंग रोडसाठी भराव सुरु आहे. तो भराव योग्यप्रकारे होत नसल्याने भविष्यात पूर्ण उत्कर्ष नगर पाण्याखाली जाणार आहे. तसेच पेण शहराच्या पूर्वेकडे मोठ मोठाले गृहनिर्माण प्रकल्प सुरु आहेत. त्यानेदेखील पेण-खोपोली मार्गावरील पाण्याचा निचरा होणारे मार्ग बंद केल्याचे •> पान २ वर

# उद्या चरीच्या संपाचा वर्धापन दिन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चरी येथील शेतकरी संपाचा ९१ वा वर्धापनदिन बुधवारी (दि.२७) साजरा करण्यात येणार आहे. चरी ग्रामपंचायत आयोजित ऐतिहासिक सोहळा सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास होणार आहे.



कोकणात चार शतकांपासून जमीन महसुलाची खोती पद्धत होती. खोत, सावकारांच्या मगरमिठीत सापडलेल्या शेतकऱ्यांना काढण्यासाठी शेतकऱ्यांचे नेते नारायण नागू पाटील आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली लढा देण्यात आला. चरी गावातील व परिसरातील असंख्य शेतकऱ्यांनी अन्नाचा एक कण न पिकवता प्रदीर्घ काळ असा खोतांविरोधात संप पुकारला. या संपाची दखल त्यावेळी शासनाला घ्यावी लागली. शोषण करणाऱ्या सावकारांविरोधात पुकारलेला लढा यशस्वी झाला. अखेर सरकारला यावर कायदा करावा लागला. कसेल त्याची जमीन नैसर्गिक न्याय तत्त्व अंमलात आणणारा कुळ कायदा मंजूर करण्यात आला. नारायण नागू पाटील यांच्या प्रभावशाली नेतृत्वाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला पाठिंबा आणि संपातील शेतकऱ्यांच्या संघर्षाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी चरी शेतकरी संपाचा वर्धापन दिन साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने संविधान विशेष कार्यक्रमही घेण्यात येणार आहे.

## पांढरा कांदा लागवडीला सुरुवात; शेतकऱ्यांची लगबग सुरू

# अलिबागच्या मातीत मोत्यांची माळ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

औषधी व चविष्ट म्हणून अलिबागच्या पांढऱ्या कांद्याकडे पाहिले जाते. त्याला शेतकऱ्यांचा पांढरं सोनंही म्हटले जाते. रुचकर चव आणि औषणी गुणधर्मामुळे पांढरा कांदा नावारुपाला आला आहे. त्यामुळे स्थानिक बाजारासह राज्यासह व अन्य देशातही कांद्याला प्रचंड मागणी आहे. अलिबागमधील कार्ले, खंडाळे परिसरातील असंख्य शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करण्याच्या कामाला लागू लागले आहेत. लागवड करण्याची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे शेकडो हातांना आता काम मिळू लागले आहे.

अलिबागमधील पांढरा कांद्याला पर्यटकांकडूनदेखील पसंती दर्शविली जाते. अलिबागला फिरायला आल्यावर अलिबागचा पांढरा कांदा विकत घेण्यावर पर्यटक अधिक भर देतात. अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, नेहुली,





वाडगाव अशा अनेक गावांतील शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करतात. दोन-अडीच महिन्यांत कांदा तयार झाल्यावर काढणी •> पान २ वर

### मानांकन प्राप्त कांदा

अलिबागच्या कांद्याला मानांकन प्राप्त झाले आहे. यामुळे या पांढऱ्या कांद्याची एक वेगळी ओळखी निर्माण झाली असून, स्थानिकांसह देशभरात येणाऱ्या पर्यटकांकडूनही मागणीत वाढ होत आहे. वाढत्या मागणीमुळे शेतकरीसुद्धा कांद्याचे अधिकाधिक उत्पादन मिळावे यासाठी मेहनत घेत आहेत. सध्या कांदा लागवड करण्यात शेतकरी गुंतला आहे.

# नागरिकांना घरपट्टीवाढीचा 'शॉक'

## ■ पोलादपूर नगरपंचायतीचा कारनामा; इमारत जुनी होत जाईल तशी घरपट्टी दुप्पट

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**तालुक्याच्या गावाच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर विशेष बाब म्हणून नगरविकास विभागामार्फत कोट्यवधींचा निधी मंजूर झाल्याचा दावा गेल्या १२ वर्षांपासून होत आहे. असे असताना पोलादपूर नगरपंचायतीने नागरिकांना सोमवारपासून 'इमारत जुनी होत जाईल तशी घरपट्टी दुपटीने वाढत जाईल' असा घरपट्टीवाढीचा 'शॉक' देण्यास सुरूवात केली आहे. यासंदर्भातील हरकती नोटीस बजावल्यापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकाऱ्यांकडे दाखल कारणे व पुराव्यासह लेखी स्वरूपातील हरकती न दिल्यास संबंधित नागरिकांना या घरपट्टीवाढीला सामोरे जावे लागणार आहे.**




पोलादपूर नगरपंचायतीच्या करनिर्धारण विभागामार्फत दि. २० नोव्हेंबरनुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम ११९ अन्वये मा.मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने विशेष नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये नवीन व पुनर्मूल्यांकन मालमत्तेची विशेष नोटीस या विषयान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम १०६ अ अन्वये सन २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराच्या २० टक्के रक्कम अथवा सद्यःस्थितीत असलेला ग्रामपंचायत घरपट्टी कर यापैकी जे जास्त असेल, ते देय राहील ते सन २०२४-२५ मध्ये आकारण्यात येणार आहे, असे नमूद करून २०२५-२६ मध्ये ४० टक्के, २०२६-२७ मध्ये ६० टक्के, सन २०२६-२७ मध्ये ८० टक्के आणि २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराची रक्कम या नोटीशीनंतर आकारण्याच्या कराच्या १०० टक्के आकारण्यात येणार आहे.

या संदर्भात मजला, वापर, उपवापर, बांधकामाचा वर्ग म्हणजेच मातीचे बांधकाम, साधे बांधकाम, लोडबेअरिंग बांधकाम, आरसीसी बांधकाम असे वर्ग, चटई क्षेत्र, वार्षिक करयोग्य मूल्य आणि करयोग्य मुल्य असे तपशील नमूद करण्यात आले आहेत.

पोलादपूर नगरपंचायतीच्या गेल्या सात वर्षांच्या कारकीर्दीमध्ये 'गड्या आपुला गावच बरा' अशी मानसिकता नागरिकांची होत असताना नगरपंचायतीच्या सर्व क्षेत्रात फिल्टरेशन प्लांट वापरून पाणीपुरवठा, नागरी स्वच्छता, प्रशासकीय कामकाज, नागरी सुविधा व कार्यालयीन तत्परता, मुख्याधिकाऱ्यांची अनुपस्थिती व कर्मचाऱ्यांची कमतरता, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे नगरपंचायतीत समावेशनाची समस्या, नगरपंचायत शिक्षण व आरोग्य विभाग, नगरपंचायत नागरी सुरक्षा तसेच अग्निशमन, शवदाहिनी व स्मशान, रस्ते व गटारे, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीतील अपयश उघड झाले असताना नागरिकांच्या डोक्यावर मालमत्ता करवाढीचा डोंगर उभा करण्याची भूमिका कितपत योग्य, असा सवाल नागरिकांना भेडसावत आहे.

# बिनकामाचा बंधारा; स्थानिकांची डोकेदुखी?



**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील वऱ्हाड-जांभुळपाडा हद्दीतील जांभुळपाडा येथे आंबा नदीवर बांधण्यात आलेला काँक्रिट बंधारा सध्या स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. लाखो रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या या बंधाऱ्याचा उपयोग मात्र शून्य आहे.

बंधारा बांधण्यामागील उद्दिष्टे स्पष्ट नसल्यामुळे आणि त्याच्या अकार्यक्षमतेमुळे स्थानिकांमध्ये नाराजी पसरली आहे. अनेक गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे, ज्यामुळे या बंधाऱ्याच्या बांधकामाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिकांमध्ये चर्चा आहे की, हा बंधारा ठेकेदाराच्या फायद्यासाठी बांधण्यात आले असल्याचे बोलले जात आहे. या बंधाऱ्यामुळे पाणी साठवणुकीची समस्या सुटण्याऐवजी खालच्या बाजूला असणारे गावांची पाण्याची समस्या अधिकच गंभीर झाली आहे.

या परिस्थितीमुळे स्थानिक प्रशासनावर आणि ठेकेदारांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्थानिकांनी या बंधाऱ्याविषयी त्वरित चौकशी करण्याची मागणी केली आहे.

# चालत्या गाडीने घेतला पेट

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामोठे बाजूकडून अलिबागकडे जाणार्या एका गाडीने पनवेल जवळील तक्का येथील उड्डाण पुलावर अचानकपणे पेट घेऊन काही क्षणातच ही गाडी आगीच्या भस्मसात झाली. सुदैवाने गाडीतील दोघेही बचावले आहेत.



कामोठे येथून अलिबाग येथील आपल्या घरी राणे व त्यांचे सहकारी हे आज सायंकाळी जात असताना अचानकपणे तक्का येथील उड्डाण पुलावर गाडीमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने त्यांनी गाडी बाजूला घेतली व ते गाडी बाहेर येवून आग विझविण्याचा प्रयत्न करीत असताना गाडीने अचानकपणे पेट घेतला व काही वेळातच ही गाडी आगीत भस्मसात झाली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुरुड डोंगरी चढावावर कार पलटी

**। मुरुड । वार्ताहर ।**

डोंगरी येथील चढावावर पर्यटकांची कार पलटी झाली. पर्यटक सुखरूप असल्याचे समजते. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची कार डोंगरी चढावावर आली असताना अरुंद रस्ते व सुरक्षा भिंत नसल्याने रस्त्याच्या कडेला जाऊन दहा फूट खाली कोसळली. या कारमध्ये असलेले पर्यटक किरकोळ जखमी झाले आहेत. संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर या डोंगरी चढावावर सुरक्षा भिंत बांधावी व रस्त्याचे लवकरात लवकर रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी जनमानसातून जोर धरू लागली आहे.

# पशुगणनेसाठी यंत्रणा कामाला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात २१व्या पशुगणनेला सोमवारी (दि.२५) सुरुवात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा या मोहिमेच्या कामाला लागली आहे. त्यासाठी जिल्ह्यात १५३ प्रगणक, २७ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, डॉ. सचिन देशपांडे, डॉ. शामराव कदम, डॉ. राजेश लाळगे उपस्थित



होते. मागील पशुगणना २०१९ मध्ये करण्यात आली होती. त्यामध्ये गाय १ लाख ७६ हजार ९०६,म्हैस ६२ हजार २२५, मेंढी २ हजार २०३, शेळी ९० हजार १८८, कुक्कुट पक्षी ४० लाख २४ हजार ५२३ अशी नोंद करण्यात आली होती. यंदाची पशुगणना २५ नोव्हेंबरपासून सुरु करण्यात आली आहे. पशुगणना करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन विभाग व जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.ही मोहिम २८ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. गायवर्ग, म्हैसवर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बदक, कुक्कुट या पक्षांची गणना केली जाणार आहे. पशु गणनेसाठी पशुसंवर्धन विभागाचे १८० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत ज्ञान असलेल्या ६५ कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आली आहे. महानगर पालिका क्षेत्रातील या कर्मचाऱ्यांचा यामध्ये सहभाग राहणार असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली आहे.

## जिल्हाधिकारी, सीईओंच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ

### पशुसंवर्धन विभागाकडून आवाहन

**पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते. पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे. त्यानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे आपल्याकडील पशुंची खरी माहिती द्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्ह्यातील पशुपालकांना करण्यात आले आहे.**

# विठ्ठल रखुमाईची आजपासून यात्रा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली येथील जत्रा सुरू झाली असून ही जत्रा म्हणजे परिसरातील लहान मुलांचे आकर्षण ठरते. विशेष म्हणजे माहेरवाशिणी या जत्रेसाठी आवर्जून येतात. शनिवारी आणि रविवारी या जत्रेस गर्दी होईल मात्र दररोज रात्री जत्रेसाठी मोठ्या संख्येने येत आहेत.या मंदिराची निर्मिती पेशवेकाळातील असून पेशवेकालीन परंपरा आजही जपली जाते.

श्री विठ्ठल संस्थान दहिवली या घटनात्मक संस्थेस यावर्षी शंभर वर्षेपूर्ण होऊन गेली असली तरी देवस्थानचा इतिहास यापेक्षा फारच जुना आहे. या मंदिराच्या समोरील बाजूस सभोवती पार बांधलेले वड पिंपळाचे पुरातन वृक्ष असून आजही ज्येष्ठ नागरिक सायंकाळी त्या पारावर बसून गप्पा गोष्टी करताना पहायला मिळतात. जणु त्या सुखदुःखाच्या गोष्टी करणाऱ्या त्या नागरिकांवर हे वृक्ष मायेची सावली व वाऱ्याच्या झुळुकेची पाठवणी करीत असतात. तर पाराच्या जवळ मारूती मंदीर असून उजव्या बाजूला श्रीगणपती व श्रीचिंतामणीश्वराची स्वतंत्र मंदिरे आहेत.विठ्ठल मंदिरात जाण्यासाठी उंच दगडी चिरेबंदी चौपदरी कौलारू छप्पर आहे.मोठे वेणगाव येथे ते वास्तव्यास असतांना पेशव्यांचे वतीने सुभेदारीण पार्वतीबाई यांनी वैशाख शुद्ध १३ शके १७१४(इ.स.१७९२)मध्ये म्हणजेच २२८-२९ वर्षांपूर्वी दहिवली गावात नवीन विठ्ठल मंदिर बांधले ज्यावेळी सवाई माधवराव पेशवे जातीने उपस्थित होते.

मंदिरातील सभामंडपात प्रवेश करून उजव्या बाजूला आत प्रवेश केल्यावर श्रीगणेशाची मूर्ती, काशी विश्वेश्वराची पिंडी, पार्वतीमाता, नंदी तसेच आतील बाजूस कोरीव काम असलेल्या लाकडी देव्हाऱ्यात विराजमान असलेल्या काळ्या पाषाणातील तेजपुंज विठ्ठल रखुमाई मूर्ती असे दर्शन होते. कार्तिक वद्य एकादशी ते अमावास्येपर्यंत येथे यात्रा भरते आणि त्या यात्रेत पूर्वीच्या काळी वाहन म्हणून घोड्याचा वापर होत असे त्याकाळी ही जत्रा घोड्यांच्या खरेदी विक्री करीता प्रसिद्ध होती असे म्हणतात.२६ नोव्हेंबर पासून जत्रेला प्रारंभ झाला दुपारी कीर्तन तर रात्री पालखीतून श्रींची मिरवणूक निघणार आहे. त्रयोदशीस दुपारी काल्याचे कीर्तन व श्रींची नदीकिनारी मिरवणूक नेण्यात येणार आहे. एकादशीच्या दिवशी रात्री साडे अकराच्या सुमारास सुभेदारांच्या हस्ते पूजा होऊन श्रींची पालखी मंदिरातून निघणार आहे.

# उद्योजकता विकास कार्यशाळा संपन्न

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालयात उद्योजकता विकास यावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री.मंगेश डफळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले. या कार्यक्रमाचे समन्वयक सहाय्यक प्राध्यापक श्री अनिल कुमार हे होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि प्रास्ताविक सहाय्यक प्राध्यापिका तृप्ती विचारे यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच उद्योजकता विकास या पुस्तकाचे लेखक डॉ.दत्तात्रय पांडुरंग राणे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, उद्योजकता विकास व्हावा औद्योगिक वाढीसाठी, सूक्ष्म-लघु उद्योग वाढ, ग्रामीण व अविकसित भारतातील भागाचे विकासासाठी, महाविद्यालयांमधील तरुण-तरुणींना रोजगार निर्मिती व वाढ करता यावी,विविध प्रकारच्या नाविन्यपूर्ण संधी उपलब्ध करणे,व्यवस्थापनाचे कौशल्य वाढविणे व त्यामुळे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी याचा उपयोग होईल ही उद्दिष्ट्ये सांगितली. उद्योजक, उद्योजकता व व्यवस्थापक यांच्या मधील फरक समजावून सांगितला. प्रमुख मार्गदर्शक मंगेश डफळे यांनी मार्गदर्शन असे केले की, मजबूत उद्योजकाचा पाय समजावून सांगितला तसेच उद्योजकतेच्या मूलभूत गोष्टी,केस स्टडीज जे प्रेरणा देतात, जीवनावश्यक कौशल्ये, स्वप्न पाहणाऱ्यांचे आणि करणाऱ्यांचे नेटवर्क या मुद्द्यांवर सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

पान १ वरून

## महिला सुरक्षा ऐरणीवर

असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही. रायगड पोलीस दलातील अलिबाग, रेवदंडा, मुरूड, रोहा, पोयनाड व मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वर्षांमध्ये २०२ ठिकाणी चोरी झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामध्ये अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५८, रोहामध्ये ७८, रेवदंडा १८, मुरूड १९, मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६ गुन्हे घडले आहेत. त्यामुळे मालमत्ता सुरक्षेचा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे. चोरी, महिलांवरील अत्याचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यावर भर दिला आहे. त्यामुळे हा प्रश्नही कायमचा मार्गी लावण्याचा प्रयत्न होईल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## पुन्हा जोमाने काम करु : पाटील

पंतप्रधान नरेंद्र मोदी, सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या सभा घेतल्या.तसेच स्टार प्रचारक प्रचारात उतरवले याविरुद्ध दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडी, शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता कोणताही मोठा नेता किंवा स्टार प्रचारक नसताना महाविकास आघाडी, शेकाप नेत्यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली माजी आमदार बाळाराम पाटील हे प्रचंड ताकदीने लढले आणि त्यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघात एक लाख बत्तीस हजार ८४० मते मिळवली. त्यामुळे महाविकास आघाडी शेकापची मते पनवेल विधानसभा मतदारसंघात वाढली आहेत. १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी ही पनवेल मधील काळसेकर महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी सुरू झाली. ८ वाजता टपाल मतदानाची सुरवात झाल्यापासून शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील हे आघाडीवर होते.

पहिल्या फेरीत बाळाराम पाटील यांनी ३ हजार ६१२ मतांनी आघाडी घेतल्याने बाळाराम पाटील पहिल्या फेरीपासून आघाडीवर होती. बाळाराम पाटील यांची ही आघाडी पाच फेऱ्या पर्यंत टिकवण्यात त्यांना यश मिळाले. दुसऱ्या फेरीत ७ हजार ८३६ मताची त्यांनी आघाडी मिळवली, तिसऱ्या फेरीत बाळाराम पाटील यांची ही आघाडी काहीशी कमी होताना दिसून आली. तिसऱ्या फेरीत त्यांनी ६,२३१ मतांची आघाडी मिळवली त्या नंतर चौथ्या फेरीत त्यांनी पुन्हा ६ हजार ९७१ मताची आघाडी घेत आघाडी कायम ठेवली आहे. मात्र ही आघाडी पाचव्या फेरीत ६५४ वर आली.

## कार्यकर्त्यांनी खचू नये : स्नेहल जगताप

पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांना व सहकारी पदाधिकाऱ्यांसमोर स्नेहल जगताप यांनी या निवडणुकीदरम्यान दोन महिन्यांपासून महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी घेतलेल्या अथक प्रयत्नाबद्दल त्यांना धन्यवाद दिले. आपली लढाई ही सोपी नव्हती हे माहीत असूनही महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी या लढाईमध्ये तन, मन, धन हरपून सर्वस्व दिल्या कारणानेच आपण ९१ हजार मतांपर्यंत पोहोचू शकलो असे स्पष्ट केले. पराभवाची कारणमीमांसा करून पुढील विजयासाठी सर्वांनी सिद्ध होण्याचे आवाहन केले. तसेच संपूर्ण मतदारसंघाच्या आभार दौऱ्याचे आयोजन करुन मतदाराराजाने दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानणार असल्याचे स्नेहल जगताप यांनी सांगितले.

## आजपासून वरसोलीची यात्रा

वातावरणात ही यात्रा संपन्न होते. यावर्षी मंगळवारपासून रविवारपर्यंत म्हणजेच २६ नोव्हेंबर ते एक डिसेंबर या कालावधीत वरसोली यात्रा आहे. या यात्रेत भाविकांची पाच दिवस अलोट गर्दी होते. त्यानुसार भाविकांची कुठलीही गैरसोय होऊ नये, त्यांना आवश्यक त्या प्राथमिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विठ्ठल-रखुमाई मंदिर देवस्थान व यात्रा कमिटीने मेहनत घेतली आहे. मध्यरात्री काकड आरती होणार आहे. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अभिषेक झाल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले केले जाणार आहे. सकाळपासून दिवसभर भजन, कीर्तन आदी धार्मिक उपक्रम घेण्यात येणार आहेत.

यात्रेनिमित्त विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी योग्य पद्धतीने रांगांचे नियोजन करण्यात आले आहे. मंदिराच्या परिसरासह काही अंतरावर खाद्यपदार्थांपासून वेगवेगळ्या वस्तू, पूजेचे साहित्य, खेळणी अशा वेगवेगळ्या प्रकारची लहान-मोठी दुकाने थाटली जाणार आहे. आकाश पाळणा व इतर खेळाची दुकानेही यात्रेमध्ये असणार आहेत. दुकानदारांसाठी पिण्याचे पाणी, वीजपुरवठा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

**पोलीस मदत केंद्र उभारणार**

यात्रेमध्ये लाखो भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अलिबाग पोलिसांमार्फत योग्य ते नियोजन करण्यात आले आहे. ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी गर्दीत पोलिसांची साध्या वेशात गस्त राहणार आहे. यात्रेच्या अनुषंगाने यात्रा कमिटीची बैठक घेण्यात आली असून, त्यांना सूचना करण्यात आल्या आहेत. यात्रेमध्ये मदतीसाठी मदत केंद्र उभारण्यात आला आहे. सर्वांनी मंगलमय व आनंदमय वातावरणात हा सोहळा साजरा करा, असे आवाहनही अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी केले आहे.

## कार नदीत कोसळून दोन ठार

संध्याकाळी ५ वा.च्या सुमारास महाड बाजूकडून मुंबई बाजूकडे जात असलेली मारुती सुझुकी सेलेरिओ गाडी (एमएच १६ बीएच ४८२९) वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. हा अपघात एवढा भीषण होता की, गाडीचा पूर्णतः चक्काचूर झाला आहे. या गाडीमध्ये एकूण तीन प्रवासी प्रवास करीत होते. त्यातील दोघांचा मृत्यू झाला असून, चालक गंभीररित्या जखमी झाला आहे. मयतांमध्ये १ महिला देवयानी दशरथ दुदुमकर व एक पुरुष दशरथ दुदुमकर अशी नावे असून, ते अँटॉप हिल मुंबई येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी तातडीने दाखल झाले. ग्रामस्थ व क्रेनच्या सहाय्याने मारुती कार गाडीला वर काढण्यात आले आहे. जखमी कार चालकाला पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे दाखल करण्यात आले आहे.

## अलिबागच्या मातीत मोत्यांची माळ

करून तो सुकविणे, त्याच्या माळी तयार करणे, त्यानंतर तो बाजारात विक्रीसाठी पाठविणे ही प्रक्रिया केली जाते. या कांद्याच्या लागवडीमधून लाखो रुपयांची उलाढाल होते. ही कामे करण्यासाठी स्थानिक महिलांच्या हाताला काम मिळते. रोजगाराचे साधन या कालावधीत सुरू होते.

यंदा अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यास गेल्या आठ दिवसांपासून सुरूवात झाली आहे. सुमारे २७५ हेक्टर क्षेत्रामध्ये ही लागवड करण्यात आली आहे. कांदा उत्पादक शेतकरी कांदा लागवडीच्या कामाला लागले आहेत. आळी तयार करणे, त्यामध्ये कांद्याच्या रोपांची लागवड करण्याचे काम सुरु झाले आहे. वाफे पद्धतीने लागवडीवर शेतकऱ्यांनी अधिक भर दिल्याचे चित्र आहे. दोन महिन्यांनंतर कांदा तयार होऊन जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात कांदा बाजारात जाण्याची शक्यता आहे.

## यंदा उत्कर्षनगर जाणार पाण्याखाली

दिसत आहे. त्यामुळे उत्कर्ष नगरासह शिंगरुत वाड्यापर्यंत पावसाचे पाणी तंबून नागरिकांना राहणे कठीण होणार असे काहीसे चित्र दिसत आहे. परंतु, त्याबाबत पेण नगरपालिका बांधकाम विभागाला काहीही पडलेले नाही. कारण, अधिकारीवर्गावर प्रशासकाचा वचक राहिलेला नाही. त्यामुळे अधिकारी वर्ग स्वहित जोपासून मनमानेल तसे कारभार करीत आहेत. परंतु, या मनमानी कारभाराचा फटका उत्कर्ष नगरवासियांना झाल्याशिवाय राहणार नाही एवढे नक्की. रिंगरोडसाठी केलेला भराव आणि पूर्व भागामध्ये बांधकाम व्यावसायिकांनी केलेला भराव पाहता येत्या पावसाळ्यात उत्कर्षनगरमध्ये पाणीच पाणी पहायला मिळेल.

# मोबाईल चोरास ठोकल्या बेड्या

## ■ पुजारा टेलिकॉम दुकानातील लाखो रुपयांचे मोबाईल चोरीला

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील उरण नाका, कोळेश्वर चौक येथे असलेल्या पुजारा टेलिकॉम दुकानात घरफोडी करून लाखो रुपये किंमतीचे जवळपास ५५ मोबाईल चोरुन नेणाऱ्या एका तरुणास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने अटक केली असून त्याच्याकडून आतापर्यंत ४१ मोबाईल ज्याची किंमत १९ लाख २२ हजार ७७१ रुपये इतकी आहे. ते हस्तगत केले आहेत.



पुजारा टेलीकॉम शॉपचे कोणीतरी अज्ञात चोरट्याने शटरचे कडी कोयंडा कापून दुकानामधील विकीस ठेवलेले नवीन पेटीपॅक व जुने असे २३,९५,१६३ रूपये किंमतीचे एकुण ५५ मोबाईल फोन घरफोडी चोरी करून नेल्याने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती.

पनवेल शहर पोलिसांचे पथक तसेच गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे पथक समांतर आरोपीचा शोध घेत असताना कक्ष कार्यालयाकडील पोलीस पथकाने घटनास्थळाची पाहणी करून आरोपी येण्याजाण्याचे मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेजची पाहणी केली असता गुन्ह्यातील आरोपी घटनेच्या रात्री मोटर सायकलवरून घटनास्थळ परिसरात वावरत असल्याचे दिसून आले. सदर इसमाची ओळख पटविली असता सदरचा गुन्हा आकाश वळकुंडे याने केल्याचे निष्पन्न झाले.

गुन्ह्यातील आरोपी आकाश राजाराम वळकुंडे गुन्ह्यातील चोरीचे मोबाईल फोन विक्री करण्यासाठी सीबीडी, बेलापुर रेल्वे स्थानक पार्किंग परिसरात आला असताना त्यास ताब्यात घेतले. आकाश वळकुंडे यास विश्वासात घेवून केलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान त्याचेकडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मोबाईल फोन पैकी १९,२२,७७१ रूपये किंमतीचे एकुण ४१ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले.

या गुन्ह्यातील आरोपीचा शोध पोलीस आयुक्त नवी मुंबई मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोआ, गुन्हे शाखा, अजयकुमार लांडगे यांचे पर्यवेक्षणाखाली गुन्हे शाखा कक्ष २ नेमणूकीतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उमेश गवळी, सपोनि प्रविण फडतरे, अजित कानगुडे, पोउपनि प्रताप देसाई, मानसिंग पाटील, माधव इंगळे, अभयसिंह शिंदे, पोलीस हवालदार रमेश शिंदे, अनिल पाटील, प्रशांत काटकर, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, रणजित पाटील, निलेश पाटील, इंद्रजित कानु, अजित पाटील, पोलीस नाईक अजिनाथ फुंदे, पोलीस शिपाई लवंकुश शिंगाडे, विकांत माळी यांनी केली आहे.

# मुरुड-अलिबाग मार्गावर सर्वे उतारावर टेम्पोला अपघात

**। मुरुड । वार्ताहर ।**

मुरुड-अलिबाग मार्गावर सर्वे चढावावर टेम्पोला अपघात झाला आहे. हा अपघात उतारामध्ये खचलेल्या रस्त्यामुळे झाल्याचे समजते. या सर्वे उतारात रस्त्याचा काही भाग खचलेला असल्याने येणाऱ्या वाहनांचा तोल जातो. त्यामुळे चालकाचा ताबा वाहनांवर राहात नाही. त्यामुळे अपघात होत आहेत. या रस्त्याच्या खचलेल्या भागाची लेव्हल करणे गरजेचे आहे. तरच संभाव्य अपघात



होण्याची शक्यता कमी होईल. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर लक्ष पुरवून या रस्त्याची डागडुजी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

निवडक

## ध्यान महोत्सवाचे आयोजन

**पनवेल :** हॅपी थॉट्स नावाने ओळखल्या जाणाऱ्या तेजज्ञान ग्लोबल फाऊंडेशन या आध्यात्मिक सेवाभावी संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त १ डिसेंबर रोजी वाशी येथे तर ०८ डिसेंबर रोजी पनवेल तसेच १५ डिसेंबर रोजी अलिबाग येथे रजत जयंती ध्यान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली. यावेळी विजेंद्र जैन, प्रज्ञा कोळवणकर, प्रभात कोळवणकर, आशा सरकटे, विलास साठे, शागुप्ता गदने आदींनी माहिती दिली.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**रोहा :** अल्पवयीन मुलीला लग्नाच्या भूलथापा देत अनैतिक संबंध ठेवल्याचा प्रकार कोलाड विभागातील गौळवाडी येथे घडला आहे. दीपक जाधव असे आरोपीचे नाव असून पाथरशेत आदिवासीवाडी येथील अल्पवयीन मुलगी व तिचे आई-वडील असे आरोपीच्या घरी झोपले होते. यावेळी आरोपीने पीडितेजवळ जाऊन माझे लग्न जमले आहे; परंतु मी त्या मुलीसोबत लग्न करणार नाही. मी तुझ्यासोबत लग्न करतो, अशा भूलथापा देत तिच्यावर अत्याचार केले.

## ऑर्केस्ट्राने जिंकली मने

**रोहा :** उडदवणे येथे काळभैरव जयंती उत्सवाप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या जल्लोष ऑर्केस्ट्राने रसिकांची मने जिंकून वाहवा मिळवली. धार्मिक कार्यक्रमांबरोबरच रसिकांच्या मनोरंजनासाठी प्रसिद्ध कलाकार आकाश गिजे प्रस्तूत व समाधान फोफेरकर संकल्पित जल्लोष आगरी कोळी कलाकारांचा या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. या ऑर्केस्ट्रामधील नामवंत कलाकारांनी गीतांचे सादरीकरण करून रसिकांची चांगलीच वाहवा मिळवली.

## काळ भैरव जयंती उत्सव

**खांब :** धामणसई येथे काळभैरव जयंती उत्सव साजरा करण्यात आला. उत्सवाचे हे पाचवे वर्ष असल्याने उत्सवाला मोठे स्वरूप देण्यात आले होते. याप्रसंगी भैरवीनाथ रूद्राभिषेक, सत्यनारायणाची महापूजा, हरिपाठ व ह.भ.प.किरण महाजन कुंभार यांची हरिकिर्तनरूपी सेवा व तद्नंतर महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.या उत्सवाप्रसंगी उत्तम शेवडे व दिलिप शंकर जुवळे यांच्या माध्यमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** : पनवेल परिसरात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, वर्ण सावळा, अंगाने मध्यम असून अंगात निळ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट व डोक्याला रुमाल बांधलेला आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ किंवा सहा.पो. नि.स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा.

# गारव्याने मासळी गारठली

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**काही दिवसांपासून वातावरणात गारठा वाढला असून समुद्रातील तापमानही कमी झाल्याने खोल समुद्रातील मासळीही गारठल्याने ती तळाला गेली आहे. त्यामुळे मासळीची आवक ४० टक्क्यांपेक्षा अधिक घटली आहे. परिणामी, मासळीच्या दरातही वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे खवय्यांबरोबर मच्छिमारही आर्थिक संकटात सापडले आहेत. या स्थितीत मासेमारीसाठी केलेला खर्चही वसूल होत नसल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे.**



बदलत्या वातावरणाचा मासेमारी व्यवसायावर परिणाम होतो.त्यानुसार सध्या वातावरणातील गारव्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. त्यामुळे मासेमारीसाठी गेलेल्या बोटींना आवश्यक त्या प्रमाणात मासळी मिळत नसल्याने मच्छिमारांनी केलेला खर्चही निघत नसल्याने नुकसान सहन करावे लागत आहे. सध्या थंडीचा गारवा वाढल्याने पुन्हा एकदा मच्छिमारांवर संकट आले आहे. खोल समुद्रातील मासेमारीच्या एका फेरीसाठी लाखाहून अधिक रुपयांचा खर्च येतो. सध्या गारठा वाढल्याने ताज्या मासळीची आवक घाटली आहे. त्यामुळे मासळीचे भावदेखील वाढले आहेत. नवी मुंबईतील खाडीकिनारी मिळणारी मासळी ही वातावरणातील गारठ्यामुळे कमी प्रमाणात मिळू लागली आहे. वातावरणातील बदलाचा फटका हा समुद्रातील मासळीच्या विविध प्रजातींना बसतो. त्यात गारठा वाढला की समुद्रातील तापमानही कमी होते. त्यामुळे खोल समुद्रातील मासळीही गारठल्याने ती तळाला गेली आहे. रायगडातील बहुतांश मच्छिमार हे ताजी मासळी खरेदी करतात; मात्र त्या मासळीचीदेखील आवक कमी झाल्याने त्यांनादेखील भाववाढीचा फटका बसला आहे. एकीकडे गारठा वाढला; तर दुसरीकडे वाढते प्रदूषण याचा सगळा फटका मासळीच्या आवकेवर होतो. कमी मासळी मिळत असल्याने त्यांचे भावही वाढले आहेत. खाडीतून मासे, निवढी, बोईस, कोळंबी तसेच चिवणी मिळतात; पण गारठा वाढल्याने त्यांचीदेखील आवक खूपच कमी झाली आहे.

**"मांदेली आणि बोंबील हे सर्वसामान्य खवय्यांच्या पसंतीचे व परवडणारे मासेसुद्धा महाग झाले आहेत. त्यात वातावरणातील गारठ्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. परिणामी, मासळीची आवक घटली असून भाव वाढले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य मच्छिमारही आर्थिक संकटात सापडले आहेत.**
**– जयश्री पाटील, मासे विक्रेती"**

### सध्याचे मासळीचे भाव

| माशाचा प्रकार | किलोचे भाव(रु.) |
|---|---|
| पापलेट | १,२०० |
| सुरमई | १,२०० |
| बोंबील | २०० (सहा नग) |
| कोळंबी | ६०० |
| जिताडा | १,२०० |
| रावस | १,५०० |
| घोळ | १,३०० |
| हलवा | १,२०० |

# शेवंडीचे प्रमाण घटल्याने मच्छिमार अडचणीत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

स्थानिक आणि पारंपरिक मच्छिमारांना आर्थिक फायदा मिळवून देणारी आणि आखाती देशात मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या शेवंड आता मिळण्याचे प्रमाण कमी झाले आहे.त्यामुळे स्थानिक मच्छिमार अडचणीत आले आहेत.

जगभरातील सर्वच समुद्रात शेवंड आढळतात. खडकाळ, वाळूमय किंवा गढूळ पाण्यात तसेच खोल समुद्रात शेवंड आढळून येतात. शेवंडाचे काटेरी व बिनकाटेरी असे प्रकार आहेत.हिंदी महासागरात त्यांच्या ५ जाती आढळतात. समुद्रातील खडकाळ किनाऱ्यावर अथवा वाळूमय पाण्याच्या ठिकाणी या शेवंड आढळून येतात.स्थानिक मच्छीमार छोट्या होड्यांनी शेवंड मासळी पकडतात.१ नंबर सदरात मोडणारी शेवंडीचे वजन ३०० ते १५०० ग्रॅम भरते. १६०० ते १८०० रुपये किलो प्रति दराने या शेवडींची घाऊक बाजारात विक्री होते.१०० ते २५० ग्रॅम वजनाची शेवंड २ नंबरच्या सदरात मोडते.या दोन नंबरच्या शेवंडीना प्रति किलो ११०० ते १२०० रुपये भाव मिळतो. गुजरात, अलिबाग,वरळी, मुरुड, श्रीवर्धन, रेवदंडा व इतर परिसरातुन शेकडो स्थानिक मच्छिमार शेवंड विक्रीसाठी घाऊक बाजारात घेऊन येतात. दररोज सुमारे ४५० ते ५०० किलो शेवंड खरेदी करतो. त्यानंतर निर्यात कंपनीच्या व्यापाऱ्यांना विक्री केली जाते. शेवंडाचे मांस अत्यंत रुचकर असून खाण्यासाठी ते ताजे अथवा गोठवून वापरतात.



देशभरातील पंचतारांकित हॉटेल आणि आखाती देशात या शेवंडीला मोठी मागणी आहे. मात्र मोठ्या प्रमाणावर मागणी असली तरी समुद्रात

मागील काही वर्षांपासून शेवंड मिळण्याच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे.त्यामुळे स्थानिक मच्छीमारांकडूनही मागणी प्रमाणे शेवंडीचा पुरवठा होत नाही.परिणामी पुरवठा होत नसल्याने मागणी असुनही निर्यात कंपन्यांना शेवंडीचा पुरवठा करणे शक्य होत नाही. अशी माहिती मागील ३५ वर्षांपासून शेवंड विक्रीचा व्यवसाय करणारे कसारा -मुंबई येथील घाऊक व्यापारी असिफ शेखानी यांनी दिली. दिवसाकाठी एक -दोन किलो शेवंड मिळाल्यास मच्छिमारांसाठी शेवंडीचा व्यवसाय अत्यंत फायदेशीर ठरतो. मात्र सध्या समुद्रात शेवंड मिळण्याच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे.त्यामुळे स्थानिक आणि पारंपरिक मच्छिमारांना आर्थिक फायदा मिळवून देणारा व्यवसाय अडचणीत आला असल्याचे उमेश कोळी यांनी सांगितले.

# नोटाने घेतली हजारो मते

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यातून महायुतीचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी झाले. भरघोस मतदान झाले असले तरी मात्र महाड विधानसभा मतदारसंघाचा अपवादवगळता जिल्ह्यातील सर्वच मतदारसंघात मतदारांनी हजारांच्या संख्येत नोटाला या पर्यायाला मते दिल्याचे उघड झाले आहे.

अलिबाग मतदारसंघात नोटाला चौथ्या क्रमांकाची म्हणजेच १,६५८ मते मिळाली आहेत. पेण मतदारसंघात नोटाला चौथ्या क्रमांकाची म्हणजेच २,४७३ मते मिळाली आहेत. महाड मतदारसंघात नोटाला ८८९ मते मिळाली आहेत.श्रीवर्धन मतदारसंघात नोटाला चौथ्या क्रमांकावर ३,३७५ मते मिळाली आहेत. कर्जत मतदारसंघात नोटाला पाचव्या क्रमांकावर १,९५६ मते मिळाली आहेत.पनवेल विधानसभा मतदारसंघात नोटाला पाचव्या क्रमांकावर ३,९०५ मते मिळाली आहेत. उरण विधानसभा मतदारसंघात नोटाला चौथ्या क्रमांकावर २,६५३ मते मिळाली आहेत. जिल्ह्यातील एकूणच मताधिक्य पाहता, प्रमुख उमेदवारांनंतर अपक्षांपेक्षा नोटाने सर्वात जास्त मते घेतल्याचे दिसून येत आहे. अलिबाग, पेण, श्रीवर्धन, उरणमध्ये चौथ्या क्रमांकावर नोटाची मते असून, कर्जत आणि पनवेलमध्ये पाचव्या क्रमांकावर नोटाला मते मिळाली आहेत. तर, महाडमध्ये नोटाची मते सहाव्या क्रमांकावर आहेत.

### नोटा म्हणजे काय?

**भारतात प्रामुख्याने २०13 पासून नोटा हा पर्याय मतदान प्रक्रियेत वापरण्यास सुरुवात झाली. मतदान यंत्र म्हणजेच ईव्हीएमवर सर्व उमेदवारांच्या खाली नोटा हे बटण दिलेले असते. मतदान यंत्रावरील उमेदवारांपैकी कोणताही उमेदवार पसंत नसल्यास नोटाचा पर्याय दाबून नापसंती दर्शवण्याचा अधिकार मतदारांना आहे.**

# वाशी हवेलीला स्वर्ण सिंह यांची भेट

## ■ गावाच्या प्रगतीचे केले भरभरून कौतुक

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील वाशी हवेली गावाला तामिळनाडूमधील निवृत्त आयएएस अधिकारी स्वर्णसिंह यांनी भेट देऊन गावाच्या प्रगतीचे कौतुक केले.



जगन्नाथ तांडेल यांच्या नेतृत्वाखाली चालविण्यात आलेल्या योजनांमुळे गावाला नवी ओळख मिळाली आहे. पिण्याच्या पाण्याची सोय, जैविक शेती, हरित ऊर्जा आणि शिक्षणाच्या क्षेत्रात गावाने घेतलेली झेप हे भारतातील इतर गावांसाठी अनुकरणीय ठरले आहे. अशा या आदर्श गावाला नुकतीच तमिळनाडूमधील स्वर्णसिंह, आयएएस (निवृत्त) यांनी भेट दिली. स्वर्णसिंह हे श्निवासन सर्व्हिस ट्रस्टचे अध्यक्ष असून एसएसटी ही टीव्हीएस मोटर कंपनीची सामाजिक जबाबदारी पार पाडणारी शाखा आहे. २०१८ पासून एसएसटी अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांनी अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या उपस्थितीत गावातील विविध प्रकल्पांचे निरीक्षण करण्यात आले. एसएसटी तर्फे सामाजिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला.

# सुदृढ आरोग्यासाठी अध्यात्माची गरज- प्रल्हाद पै



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

सद्गुरू वामनराव पै यांनी उभारलेल्या कर्जत वैजनाथ तेथील जीवनविद्या ज्ञानपीठ मध्ये नाम धारकांचा आनंद मेळावा सुरू झाला आहे.आठ दिवस चालणाऱ्या या आनंद मेळाव्याची सुरुवात जीवनविद्या मिशनचे विश्वस्त प्रल्हाद वामनराव पै यांच्या प्रकट मुलाखतीतून झाली.दरम्यान,मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी अध्यात्माची गरज असल्याचं सल्ला प्रल्हाद वामनराव पै यांनी नामधारकांना दिला.

कर्जत तालुक्यातील वैजनाथ गावी सद्गुरू वामनराव पै यांनी उभारलेल्या जीवनविद्या ज्ञानपीठामध्ये नामधारकांचा आनंद मेळाव्याला २४ नोव्हेंबर पासून सुरुवात झाली. सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कर्जतमधील जीवनविद्या ज्ञानपीठामध्ये २४ ते २९ नोव्हेंबर दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून हजारो शिष्यमंडळी सहभागी होत आहेत. दररोज दोन पर्वात विविध उपक्रमांचे आयोजन या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणार आहेत. २४ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सकाळच्या सत्रात ज्ञानेश्वर माऊलींचा हरिपाठ, संगीत जीवनविद्या, दिव्य अनुभूती देणारी मानसपूजा, मानसिक शांतता देणारी शरीरसाधना, कृतज्ञतापूर्वक करण्यात आलेले गुरुपूजन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात जेष्ठ नाम धारक दिलीप कुलकर्णी आणि ज्येष्ठ प्रबोधक विश्वनाथ कामत यांना या वर्षाची जीवनगौरव पुरस्कार प्रल्हाद पै यांचे हस्ते देवून त्यांचा सन्मान करण्यात आले.

# मुरूड तालुक्यात मेंढपाळांची भटकंती सुरू

**। मुरूड । वार्ताहर ।**

पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील मेंढपाळ चारा-पाण्यासाठी कोकणात दाखल झाले आहेत. पुढील सहा महिने कोकणात मुक्काम करून पुन्हा आलेल्या मार्गी आपल्या मूळ गावी प्रस्थान करतात. सध्या येथील माळरानावर आपले बिऱ्हाड घेऊन भटकंती करताना मेंढपाळ दिसून येत आहेत. तर, शेतकऱ्यांकडून त्यांना काही पैसे देऊन शेळ्या-मेंढ्यांना शेतामध्ये बसविल्या जात आहेत. तर, मेंढ्यांची लोकर विकून हातामध्ये चांगले पैसे येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

पुणे-साताऱ्यातील काही दुष्काळग्रस्त भागातून अनेक मेंढपाळ नोव्हेंबरच्या सुमारास रायगड जिल्ह्यात दाखल होतात. यंदाही मुरूड तालुक्यातील शिघ्रे, वाणदे, जोसरांजण, वावडुंगी, नवीवाडी आदी गावातील मोकळ्या रानमाळावर मोठ्या प्रमाणात मेंढपाळ दाखल झाले आहेत. त्यांच्या शेळ्या-मेंढ्यांना येथील माळरानावर मुबलक असा चारा-पाणी मिळत आहे. घाटमाथ्यावरील दुष्काळी भागात पाणी नसल्यामुळे शेती करता येत नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी कोकणात यावे लागते, असे येथील मेंढपाळ शंकर पडळकर यांनी सांगितले. त्यामुळे मेंढीपालनाचा जोड व्यवसाय फायदेशीर असल्याचे ते म्हणाले.

एक मेंढी सरासरी तीन ते चार हजाराला खासगी वा बाजारात विकली जाते. शिवाय दीडशे ते दोनशे मेंढ्या बाळगताना २५ ते ३० किलो लोकर विक्री होत असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय, बागायतदारांच्या शेतात मेंढ्या रात्रभर बसवल्यास खर्ची म्हणून मेंढपाळांना पुरेसे पैसे दिले जातात.

भात पिकविणारे शेतकरी तांदूळही देऊ करतात. मेंढ्यांना विशेषतः रात्रीचे संरक्षण कवच म्हणून दिमतीला चार ते पाच तगडी कुत्रीही मेंढपाळांकडून पाळली जातात. एका गावातून दुसऱ्या गावात संसार वाहून नेण्यासाठी घोडेही उपयोगी ठरतात.





● मुरूड-एकदरा परिसरात कोळी बांधव आपल्या नवीन जाळ्यांना रंग देण्याचे काम करत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## रायगडात थंडीच्या आगमनाची चाहूल

# बाजारात उबदार कपड्यांची आकर्षक रंगसंगती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**दरवर्षीच्या तुलनेत यंदा थंडीच्या आगमनाची चाहूल लवकर जाणवू लागली आहे. सायंकाळी व सकाळच्या सुमारास तपमानाचा पारा घसरत असल्याने नागरिकांनी ठेवणीतील उबदार कपडे बाहेर काढण्यास सुरुवात केली आहे.**



अनेक नवनवीन डिझाईन्सच्या उबदार कपड्यांसह विविध फॅशनच्या मफलर व मखमली स्टॉल्सच्या खरेदीचा सध्या ट्रेण्ड दिसून येत आहे.थंडीची चाहूल लागताच विविधरंगी उबदार कपडे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. नागरिकांकडून उबदार कपड्यांना मागणी वाढू लागली आहे. बाजारपेठेसह रस्त्यावर असलेल्या दुकानांमध्ये गरम कपडे खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

बाजारपेठेमध्ये स्वेटर, जॅकेट, कान टोपी, हातमोजे, पायमोजे, महिलांचे स्वेटर अशा विविध प्रकारच्या खरेदीसाठी गर्दी होत आहे. लहान मुलांच्या हातमोज्यांपासून ते विविध लहान-लहान सुंदर बंद गळ्याचे जॅकेट्स बाजारात उपलब्ध आहेत. मुलांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी मऊ कापसाचे सुंदर स्वेटर आणि क्विक ड्रायची खरेदी केली जात आहे.

**लहान मुलांना कार्टुनची भुरळ**

तरुणाईला उबदार कपड्यांमध्ये फॅशनचा ट्रेण्डही हवा असल्याने स्वेटशर्ट, विंटर कोट, कॉटन जॅकेट्स, कानपट्टी या प्रकारांना तरुणाईची मोठी मागणी आहे. लहान मुलांसाठी हुडीज, कार्टूनचे चित्र असलेले, चेन असलेल्या स्वेटरला यंदा जास्त मागणी असल्याचे चित्र दिसून येत आहे. थंडीमध्ये लहान मुले व ज्येष्ठांची जास्त काळजी घेतली जाते. अगदी पायाच्या नखापासून ते डोक्यापर्यंत लोकरीचे कपडे परिधान केले जातात. खासकरून विविध रंगसंगती असलेली वस्त्रे वापरण्याकडे महिलांचा कल वाढू लागला आहे.

दुचाकी चालवताना किंवा थंडीत चेहऱ्याला कोरडी आणि निस्तेज होण्यापासून बचावासाठी मुली स्टोलचा वापर करतात. सिल्क स्टोल सूट सलवार, जिन्स अशा सर्व वेशभूषांत तरुणींना वेगळाच लूक देतो.

### उबदार कपड्यांच्या किमती

| | |
|---|---|
| फॅन्सी स्वेटर | १,०५० |
| लोकरी स्वेटर | ४५० |
| साधे स्वेटर | ४५० |
| फॅन्सी लेडीज स्वेटर | ५०० |
| पुरुषांचे स्वेटर | १०० |
| जॅकेट | ७५० |
| हातमोजे | ५० |
| कानटोपी | ८० |
| लहान मुलांचे स्वेटर | ३५० |

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# पस्तीस टक्क्यांची लढाई

लोकशाहीमध्ये बहुमत मिळवणाऱ्याला सत्ता मिळते. मात्र बहुमत मिळाले म्हणजे जनतेने त्या पक्षाचे सर्व म्हणणे मान्य केले, विचारसरणी स्वीकारली असे नसते. आपण निवडून आलो म्हणजे आपली पूर्वीची पापे व गुन्हे धुवून निघाले असा दावा गुंड मंडळी करतात. ती त्यांची सोय असते. पण राजकीय पक्षांनी हाच युक्तिवाद करणे म्हणजे लोकशाहीचा विकृत अर्थ लावणे होय. मुळात नऊ कोटी मतदारांपैकी तीन कोटींनी मतदान केलेलेच नाही. उर्वरितांपैकी देखील ३५ टक्के विरोधात आहेत हे ध्यानात घेऊन सत्ताधाऱ्यांनी सर्वांना बरोबर घेणे अपेक्षित आहे. ताज्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला राक्षसी बहुमत मिळाले आहे. त्यामुळे ते हवेत आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये ज्या रीतीने पक्ष फोडण्यात आले, भ्रष्टाचार केला गेला ते जनतेलाही मान्य होते असा त्याचा अर्थ ते लावू पाहत आहेत. बहुमत मिळवणारा आणि सत्तेत असणारा यांचा आवाज आपल्या लोकशाहीत मोठा असतो. यशासारखे दुसरे यश नसते असेही म्हणतातच. त्यामुळे ते रेटून खोटे बोलू शकतात व माध्यमेही त्यांना उदंड प्रसिद्धी देतीलच. पण त्यामुळे काही सत्ये दडवली जाऊ शकत नाहीत. या निवडणुकीत भाजप महायुतीला तीन कोटी १७ लाख म्हणजे ४९ टक्के मते मिळाली. त्यामुळेच त्यांना २३४ जागा जिंकता आल्या. पण महायुतीची इतकी जबरदस्त लाट असतानाही याच राज्यातील दोन कोटी २७ लाख किंवा ३५ टक्के मतदार काँग्रेस, पवार गट, ठाकरे गट, कम्युनिस्ट, शेकाप, समाजवादी इत्यादी महाविकास आघाडीतील पक्षांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले आहेत. ही संख्या मामुली नाही. या ३५ टक्के लोकांमध्ये लाडकी बहीणचा फायदा मिळालेल्या महिला आणि शेतकरी सन्मानवाले शेतकरीही असतीलच. पण ते महायुतीच्या दुकानदारीला बळी पडले नाहीत. पैशांच्या बदल्यात मत असा सौदा या ३५ टक्क्यांनी केलेला नाही. आघाडीतील सर्व पक्षांनी यापुढच्या काळातही या ३५ टक्के लोकांसोबत राहणे व त्यांना आधार देणे अत्यंत गरजेचे आहे.

### धटिंगणशाहीला विरोध

आज आपलेच काही सहकारी वा मतदार कोणत्या तरी आमिषांना भुलून त्या ४९ टक्क्यांमध्ये सामील झालेही असतील. पण म्हणून ते परके झाले वा आपल्याला कायमचे दुरावले असे मानण्याचे कारण नाही. महायुतीच्या नेत्यांचा खोटारडेपणा आणि सत्तेच्या गुर्मीतील दंडेलशाही ४९ टक्क्यांमधील सर्व लोकांना मान्य आहे असे समजण्याचे कारण नाही. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी याच महाराष्ट्राने महायुतीला लोकसभेतील ४८ पैकी अवघ्या १७ जागा दिल्या होत्या. शिवसेना व राष्ट्रवादीच्या नेत्यांना इडी वगैरेंची भीती दाखवून ज्या रीतीने ते पक्ष फोडण्यात आले व ठाकरे सरकार खाली खेचण्यात आले त्याविरुध्दचा राग याच महाराष्ट्रातील लोकांनी तेव्हा व्यक्त केला होता. आता याच लोकांनी वेगळे मतदान केले असले तरी भाजपची आधीची धटिंगणशाही त्यांनी मान्य केली असा याचा अर्थ होत नाही. त्यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी धीर सोडण्याचे कारण नाही. त्यांनी महायुतीवाल्यांना हे बजावले पाहिजे की, बहुमत मिळाले असल्याने सत्ता तुमची राहील हे मान्य आहे. पण तुमचा तमाम भ्रष्टाचार आणि गुंडगिरी या सत्तेत लपेटू पाहाल तर ते आम्ही सहन करणार नाही. मालवणला शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या प्रकरणाची चौकशी जवळपास ठप्प झाली आहे. त्यातल्या एका कंत्राटदाराची नेमकी निकालाच्या दुसऱ्या दिवशी जामिनावर सुटका झाली. हे कंत्राट त्या असा पुतळा उभारण्याचा काहीही अनुभव नसलेल्या एका नवशिक्या शिल्पकाराला दिले कोणी हा प्रश्न सुटलेला नाही. पोलिस तपासात आजवर त्याच्यावर काहीही प्रकाश टाकलेला नाही. कालांतराने शिल्पकार आपटे हादेखील सुटेल व हळूहळू हे प्रकरण आठवणीच्या बाहेर जाईल. महायुतीच्या नेत्यांना तेच हवे आहे व आता निवडणुकीतील विजयाने या प्रकरणावर पडदा पडला असे ते आपल्याला सांगू पाहतील. अशी लबाडी करू पाहणाऱ्यांना ३५ टक्क्यांचा आजही ठाम विरोध आहे हे लक्षात ठेवायला हवे.

### एकजूट हवी

या ३५ टक्क्यांची लढाई सोपी नाही. हे लोक महाराष्ट्रभर विखुरलेले आहेत. अनेक पक्षांमध्ये वाटले गेलेले आहेत. स्थानिक पातळीवर त्यांच्यातही आपसात मतभेद आहेत. पण आजचा काळ प्रतिकूल आहे. नवे सत्ताधीश या ३५ टक्क्यांना दडपण्याचा प्रयत्न करतील. शरद पवार गटातील काही आमदार आमच्या संपर्कात असल्याचे अजितदादांच्या राष्ट्रवादीने म्हटले आहे. ही एका नव्या फोडाफोडीची नांदी आहे. खुद्द भाजपही १३२ जागांवर समाधानी असेल असे नाही. ते तर अजितदादा व एकनाथ शिंदे यांचे गट फोडायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. २०२९ च्या निवडणुकीत एकट्याच्या बळावर सत्तेत येण्याचे अमित शाह यांनी पूर्वीच जाहीर केले आहे. ते पाहता शिंदे व दादांना खच्ची करणे हाच त्यांचा पुढचा कार्यक्रम असेल. ते असो. पण मूळ मुद्दा असा की, महायुतीच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस व चिकाटी दाखवणाऱ्या ३५ टक्क्यांना टिकून राहणे हेदेखील आव्हान ठरू शकते. महाविकास आघाडीतील सर्व पक्षांनी एकमेकाच्या मदतीनेच हे करायला हवे. डाव्या पक्षांनी असे प्रसंग भूतकाळात अनेकदा पाहिले आहेत. मात्र त्यांनी आपला विचार गमावलेला नाही. सध्या रेवडी वाटणाऱ्या योजना आणि धर्माचे आवाहन यामुळे जनता भ्रमित झाली आहे. मात्र अंतिमतः अशा प्रकारचे सरकार हे सर्व राज्याला गाळात घालणारे आहे. हा मुद्दा डाव्या पक्षांनी लोकांना सतत पटवून द्यायला हवा. सर्व सोंगे आणता येतात, पैशांचे नाही हे लवकरच नव्या राज्यकर्त्यांना व लोकांनाही कळेलच. सोयाबीन, कापूस यांचा शेतकरी असो की, प्रकल्पांमुळे जमिनी गमावणारे कोकणातले लोक असोत, यांचे प्रश्न तीव्र होणार आहेत. ३५ टक्क्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांनी ते हाती घ्यायला हवेत. ३५ टक्के ही लहानसहान संख्या नाही. रस्त्यांवरच्या आंदोलनांमध्ये हे सर्वजण सहभागी नसतीलही. पण त्यांचा पाठिंबा आपल्याला आहे हे विरोधकांनीही ठासून सांगायला हवे.

**विचार**

# भारत-अमेरिका व्यापारसंबंध कूस पालटणार?

***अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने सलग दुसऱ्यांदा व्याजदरांना कात्री लावली आहे. अमेरिकेतील चलनवाढीची परिस्थिती आता आटोक्यात येऊ लागली असल्यामुळेच हे पाऊल उचलण्यात आले आहे. ट्रम्पशाहीमध्ये भारतातून आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंवर कर वाढवले जाण्याची शक्यता आहे. परंतु चीन ट्रम्प यांच्या रडारवर आहे. अमेरिकेने चीनवरील करदायित्व वाढवणे भारतासाठी नव्या संधी उपलब्ध करेल.***

**हेमंत देसाई**

यंदा ऑक्टोबरमध्ये देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी सुमारे एक लाख कोटी रुपये मूल्याचे समभाग खरेदी केले. याच काळात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ८५ हजार कोटी रुपये मूल्याच्या समभागांची विक्री केली. अलीकडील म्युच्युअल फंडांच्या माध्यमातून सुरू असलेली समभाग खरेदी ही भांडवल बाजारातील मूलगामी बदल दर्शवणारी आहे. हा कल घसरत्या बाजाराला सावरून कंपन्यांच्या समभागांचे मूल्यांकन योग्य पातळीवर राखण्याचे कार्य करील. तर परदेशी गुंतवणूकदारांकडून समभाग विक्रीमुळे बाजारात चढ-उतार असूनही आवश्यक स्थैर्य मिळू शकेल, असे शेअर बाजार विश्लेषकांचे मत आहे. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून असलेला निधी प्रवाह हा मुख्यतः विमा आणि सेवानिवृत्ती निधींसह म्युच्युअल फंडातील 'एसआयपी' योगदानाचा परिणाम आहे. चालू नोव्हेंबर महिन्यात एसआयपीचा ओघ कमी होऊ शकतो. परंतु सेवानिवृत्ती निधीचा प्रवाह मजबूत राहण्याची आणि वाढत राहण्याची शक्यता आहे. सध्या सुरू असलेला सणासुदीचा हंगाम, उत्तम पाऊसपाणी आणि ग्रामीण मागणीतील वाढ हे घटक नजीकच्या काळात बाजारासाठी प्रेरक ठरू शकतील. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपप्रणीत एनडीएला यश मिळाल्यास भांडवली बाजारात मोठी तेजी येईल, असा अंदाज आहे. दुसरीकडे, अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने व्याजकपात केल्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांचा ओघ परत भारताकडे वळणार, हे नक्की आहे.

अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने सलग दुसऱ्यांदा व्याजदरांना कात्री लावली आहे. अमेरिकेतील चलनवाढीची परिस्थिती आता आटोक्यात लावू येऊ लागली असल्यामुळेच हे पाऊल उचलण्यात आले आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांची निवड झाली असून ते भारतातून आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंवर कर लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु चीनही त्यांच्या रडारवर आहे. आपल्या मागच्या टर्ममध्येही ट्रम्प यांनी चीनशी व्यापारयुद्ध (ट्रेड वॉर) सुरू केले होते. त्याची पुनरावृत्ती झाल्यास, भारतासाठी संधी उपलब्ध होतील. डिसेंबरमध्येही व्याजदरांना कात्री लावण्याबाबत फेडरल रिझर्व्ह विचार करू शकते, असे त्याचे प्रमुख जेरोम पॉवेल यांनी म्हटले आहे. अमेरिकेमध्ये नव्या अध्यक्षाने पदग्रहण केले तरी तो फेडरल रिझर्व्हच्या प्रमुखांना काढू शकत नाही. आपण राजीनामा देणार नसल्याचे पॉवेल यांनी अगोदरच स्पष्ट केले आहे. मात्र व्याजाचे दर घटतात, तेव्हा व्यापारी आणि उद्योजकांचा कर्जउभारणीवरील खर्च कमी होतो. त्यामुळे उत्पादनखर्चात कपात होते आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकण्याची ताकद निर्माण होते. म्हणूनच अमेरिकेला व्याजदरघटीचा फायदा होणार आहे. तेथील बेरोजगारीही घटणार आहे. त्याच वेळी स्थलांतरितांवर नियंत्रणे तसेच काही वस्तूंवरील करवाढ यामुळे अमेरिकेतील चलनवाढ पुन्हा वाढू शकते, अशी भीती अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

ट्रम्प यांची संरक्षक धोरणेही जागतिकीकरणविरोधी असून भारतासाठी ती घातकदेखील ठरू शकतात. याचे कारण, आज जागतिक पुरवठा साखळीत (ग्लोबल व्हॅल्यू चेन) भारत हा एक महत्त्वाचा हिस्सा आहे. परंतु भारतातून येणाऱ्या आयात मालावर जादा कर लादण्यात आल्यास किंवा मालाच्या आयातीवर संख्यात्मक निर्बंध आल्यास भारताला फटका बसू शकतो. उच्च कर आणि व्यापारयुद्धामुळे अमेरिकेत उद्या चलनफुगवट्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यातच अमेरिकेची तूट वाढली तर आणि तेथील अर्थ संस्थांच्या स्वायत्ततेवर आक्रमण झाल्यास अमेरिकेत होणाऱ्या गुंतवणुकीला फटका बसू शकेल. अमेरिकेत आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास, भारतीय रिझर्व्ह बँकेलादेखील व्याजदराबद्दल वेगळा विचार करावा लागेल. डिसेंबर २०२४ नंतर व्याजदर कपात होऊ शकते, असे सूतोवाच रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केले आहे. परंतु त्यांनाही ट्रम्प यांची धोरणे लक्षात घेऊनच आपली धोरणे आखावी लागतील. किमान पुढील वर्षात भारतात व्याजदरात घसरण झाल्यासभ ारताच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे. सप्टेंबर २०२४ मध्ये संपलेल्या तिमाहीमध्ये भारतातील बड्या कंपन्यांच्या विक्रीत घट दिसून असून त्यांच्या ऑपरेटिंग नफ्यात केवळ सहा टक्क्यांची वृद्धी झाली आहे. बजाज ऑटो, अल्ट्राटेक सिमेंट, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट, पिडिलाइट, पॉलीकॅब या कंपन्यांनी गुंतवणूकदारांचा अपेक्षाभंग केला आहे.

अमेरिकेने हळूहळू चीनऐवजी अन्य देशांकडे आपला मोर्चा वाढवण्यास सुरुवात केली आहे. ट्रम्प यांच्या कारकीर्दीत चीनमधून होणाऱ्या आयातीवर कुऱ्हाड कोसळणार आहे. भारताने याचा फायदा घेतला पाहिजे. गेल्या सात वर्षांमध्ये जागतिक इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठेतील चीनचा वाटा कमी कमी होत चालला आहे. केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहनामुळे अमेरिकेतील इलेक्ट्रॉनिक्स आयातीतील भारताचा वाटा दसपटीने वाढून आता दोन टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. परंतु अन्य क्षेत्रांमध्ये भारताला असे यश मिळवता आलेले नाही. उलट, व्हिएतनाम, मलेशिया, थायलंड, तैवान या देशांनी निर्यातीमध्ये घोडदौड केली आहे. बांगलादेशातील सत्तांतरानंतर तेथील वस्त्रोद्योगाला फटका बसू शकतो. त्याचाही जास्तीत जास्त लाभ उठवून भारताने जागतिक वस्त्र बाजारपेठ काबीज केली पाहिजे. ट्रम्प यांच्या अध्यक्षपदावरील निवडीने भारताला चीनकडून धोका कमी होण्याचा वेग वाढेल. ट्रम्प यांच्या धोरणाची जी भीती घातली जाते, तिचा भारतावरील आर्थिक प्रभावही मर्यादित राहील. कारण भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वे देशांतर्गत मागणीवर चालते. त्यामुळे अमेरिकेच्या कमकुवत वाढीमुळे होणारे संभाव्य नुकसान रोखले जाईल आणि नकारात्मक वाढीचा प्रभाव मर्यादित असेल. याउलट, चीनच्या वाढीवर परिणाम झाल्यामुळे आणि जीवाश्म इंधनाकडे अधिक वळवल्यामुळे वस्तूंच्या किमती कमी होतील. कच्च्या तेलाच्या किमती कमी होणे भारतासाठी फायदेशीर ठरेल. भारताचा मोठा परकीय चलन साठा आणि वित्तीय शिस्त कोणत्याही अस्थिरतेला तोंड देऊ शकते, असे 'नोमुरा'च्या अहवालात म्हटले आहे. ट्रम्प सत्तेत आल्याने भारतावर काय परिणाम संभवतो, याचा लेखाजोखा या अहवालात मांडण्यात आला आहे. भारताचा राखीव परकीय चलन साठा मोठा आहे. स्थिर वाढ-मध्यम चलनवाढीचे मिश्रण आहे. वित्तीय शिस्त आणि सुधारणांकडे भारताचे सातत्याने लक्ष असते. अमेरिकन धोरणांमुळे उद्भवणारी कोणतीही अस्थिरता हाताळण्यासाठी योग्य आहे. भारतीय निर्यात क्षेत्राला महत्त्वपूर्ण फायदे मिळू शकतात. चीनी उत्पादनांवर उच्च शुल्क असल्याने भारताला फायदा होऊ शकतो. यामुळे ऑटो पार्टस, सौर ऊर्जा साधने, मार्केटमध्ये रासायनिक उत्पादन यासारख्या क्षेत्रांमध्ये भारतीय उत्पादकांची स्पर्धात्मकता वाढू शकते.

ट्रम्प यांच्या जीवाश्म इंधन धोरणांमुळे आणि चीनच्या मंद आर्थिक वाढीमुळे ऊर्जा खर्चात घट होऊ शकते. हे एचपीसीए, बीपीसीएल, आयओसीसारख्या भारतीय तेल कंपन्या आणि आयजीएल आणि एमजीएलसारख्या गॅस वितरण कंपन्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. उत्पादन आणि संरक्षण क्षेत्रात तेजी येऊ शकते. अमेरिकन उत्पादन आणि लष्करी क्षमता बळकट करण्यासाठी त्यांचे लक्ष भारत डायनॅमिक्स आणि एचएएल सारख्या भारतीय संरक्षण कंपन्यांसाठी चांगले ठरु शकते. ट्रम्प हे जगातील अनेक देशांमध्ये पसरलेला तणाव संपवू शकतात. अशा परिस्थितीमध्ये पुरवठा साखळीत सुधारणा होईल. त्यामुळे भारतीय व्यवसायाला मदत होईल. अमेरिकेच्या औद्योगिक विकासावर ट्रम्प यांचा भर आहे. अशा स्थितीत दोन्ही देशांमध्ये कार्यरत कंपन्यांना फायदा होऊ शकतो. यामध्ये एबीब, सीमेन्स, कमिन्स, हनीवेल, जीईटी अँड डी आणि हिताची एनर्जी यांचा समावेश आहे. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली व्यावसायिक वातावरण सुधारू शकते. यामुळे कॉर्पोरेट टॅक्समध्ये कपात होण्याची शक्यता आहे. चीनला काउंटरवेट म्हणून भारताचे सामरिक महत्त्व ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली मजबूत होत राहील, दोन्ही देशांमधील भागीदारी संरक्षण, सुरक्षा आणि आर्थिक क्षेत्रात मजबूत राहील. अहवालानुसार भारत आणि अमेरिकेचे सखोल आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंध आहेत. अमेरिका भारताला चीनसाठी प्रतिस्पर्धी मानत असल्याने, भारताची मोठी देशांतर्गत मागणी-आधारित अर्थव्यवस्था अमेरिकेच्या कमकुवत आर्थिक वाढीच्या संभाव्य नकारात्मक प्रभावांपासून सुरक्षित राहते.

**आजकाल**

# उत्तर प्रदेशात मशिदीवरुन नवा वाद पेटवला

उत्तर प्रदेश राज्यातील संभळ शहरात मशिदीवरून हिंसाचार उफाळला आहे. या भागातील शाही जामा मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान झालेल्या चकमकीत तीन जणांचा मृत्यू तर २० हून अधिक पोलिस जखमी झाले आहेत. परिसरातील तणाव पाहता इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली असून शाळाही बंद ठेवण्यात आल्या आहेत. या प्रकरणात विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सत्ताधारी भाजपावर आरोप केले आहेत आणि द्वेषाचे राजकारण म्हणून याचा उल्लेख केला आहे. पण, नेमकं संभळ शहरात काय घडलं? मशिदीवरून हिंसाचार उफाळण्याचे कारण काय?

शाही जामा मशिदीचे सर्वेक्षण करण्यासाठी सर्वेक्षकांचे पथक चंदौसी शहरात पोहोचले तेव्हा संभळमध्ये हिंसाचार उसळला. १५२६ मध्ये मशीद उभारण्यासाठी मंदिर पाडण्यात आले होते, अशी याचिका ज्येष्ठ वकील विष्णू शंकर जैन यांनी दाखल केल्यानंतर मंगळवारी (१९ नोव्हेंबर) स्थानिक न्यायालयाने या सर्वेक्षणाचे आदेश दिले होते. याचिकेत म्हटले आहे की, ''संभळ शहराच्या मध्यभागी शतकं जुने श्री हरिहर मंदिर आहे, जे भगवान कल्की यांना समर्पित आहे; ज्याचा वापर जामा मशीद कमिटीने जबरदस्तीने आणि बेकायदापणे केला आहे. याचिकाकर्त्याने पुढे असा युक्तिवाद केला की, हे स्मारक प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष अधिनियम, १९५८ अंतर्गत संरक्षित आहे आणि कायद्याच्या कलम १८ अंतर्गत, लोकांना संरक्षित स्मारकात प्रवेश करण्याचा अधिकार आहे. योगायोगाने, विष्णू शंकर जैन आणि त्यांचे वडील हरी शंकर जैन यांनी ज्ञानवापी मशीद-काशी विश्वनाथ मंदिर वादासह प्रार्थनास्थळांशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये हिंदू बाजूचे प्रतिनिधित्व केले आहे. या याचिकेवर कार्यवाही करत, चंदौसी येथील संभल येथील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग) आदित्य सिंग यांनी वकिलाती आयुक्तांना त्याच दिवशी प्रारंभिक सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले. या सर्वेक्षणाचा अहवाल २९ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.अधिकारी मंगळवारी त्यांचे सर्वेक्षण पूर्ण करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांनी दुपारी होणाऱ्या प्रार्थनांमध्ये व्यत्यय टाळण्यासाठी रविवारी सकाळी पुन्हा सर्वेक्षणासाठी जाण्याचा निर्णय घेतला. परंतु, जेव्हा अधिकारी शाही जामा मशिदीत पोहोचले, तेव्हा घोषणाबाजी करणाऱ्या लोकांचा मोठा गट त्यांना भेटला. तिथूनच वादाला सुरुवात झाली. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आंदोलकांचा गट संतप्त झाला आणि त्यांनी परिसरात वाहने जाळण्यास सुरुवात केली, तसेच घटनास्थळी जमलेल्या पोलिसांवर दगडफेक केली. हिंसाचार आटोक्यात आणण्याच्या प्रयत्नात पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रुधुराचा वापर केला आणि लाठीमार केला.

मुरादाबादचे विभागीय आयुक्त औंजनेय कुमार सिंह यांच्या म्हणण्यानुसार, या गोंधळाच्या दरम्यान गोळीबार करण्यात आला; ज्यामुळे तीन लोकांचा मृत्यू झाला. नईम, बिलाल आणि नौमन अशी मृतांची ओळख पटली आहे. याशिवाय इतरही जण हिंसाचारात जखमी झाले आहेत, ज्यात सुमारे २० सुरक्षा कर्मचारी आणि प्रशासनाच्या चार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

''पोलिस अधीक्षकांच्या पीआरओच्या पायाला बंदुकीची गोळी लागली, इतरही अधिकाऱ्यांना गोळ्या लागल्या,'' असे मुरादाबादचे विभागीय आयुक्त औंजनेय कुमार सिंग यांनी सांगितले. एका हवालदाराच्या डोक्यालाही गंभीर दुखापत झाली आहे, तर उपजिल्हाधिकाऱ्यांचा पाय फ्रॅक्चर झाला आहे, अशीही माहिती त्यांनी दिली.

संभळमधील हिंसाचारामुळे राजकीय दोषारोपाचा खेळही सुरू झाला आणि विरोधी पक्षांनी परिस्थितीसाठी भाजपाला जबाबदार धरले आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी भाजपावर टीका करताना म्हटले की, त्यांचे सरकार आणि प्रशासनाने निवडणूक गैरव्यवहारापासून लक्ष वळवण्यासाठी हिंसाचार घडवून आणला. ''निवडणुकीबाबतची चर्चा विस्कळीत करण्यासाठी एक सर्वेक्षण पथक सकाळी मुद्दाम पाठवण्यात आले. निवडणुकीच्या मुद्द्यांवर वाद होऊ नयेत म्हणून अराजक माजवण्याचा त्यांचा हेतू होता,'' असे ते म्हणाले. उत्तर प्रदेशमधील काँग्रेस प्रमुख अजय राय यांनीही सांगितले की, योगी आदित्यनाथ सरकारच्या काळात उत्तर प्रदेशमध्ये हिंसाचार दिवसेंदिवस वाढत आहे. ''राज्याचे मुख्यमंत्रीच 'बटेंगे तो कटेंगे' अशी विधाने करत असताना राज्यात शांततेचे वातावरण कसे राहणार? ही पूर्णपणे नियोजित घटना आहे,'' असे राय यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

सीपीआय (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) चे सचिव सुधाकर यादव यांनी सांगितले की, नुकत्याच मिळालेल्या विजयामुळे उत्साही झालेला भाजपा समुदायांच्या ध्रुवीकरणाला चालना देत आहे आणि राज्याला जातीयवादाच्या आगीत ढकलत आहे. मात्र, इंडिया आघाडी अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगत भाजपाने पलटवार केला आहे. भाजपाचे प्रवक्ते नलिन कोहली म्हणाले, ''कोणालाही कायदा मोडण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने आदेश दिल्यास त्याची अंमलबजावणी केली जाईल. ज्यांना आदेशात सुधारणा करायची आहे, त्यांच्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया उपलब्ध आहे.'' भाजपाचे प्रवक्ते अजय आलोक यांनीही हिंसाचारासाठी इंडिया आघाडीचा उल्लेख 'घमांडिया युती' म्हणून केला.

**लोकसंसद**

## भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण

दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस देशभरात 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. १९४९ साली याच दिवशी 'भारताचे संविधान' हे संविधान सभेत मंजूर करण्यात आले. आपल्या देशाने संविधानाचा स्वीकार केला त्याला आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान अधिकृतपणे स्वीकारल्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय संविधानाचे, राज्यघटनेचे शिल्पकार म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ त्यांच्या १२५ व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर २०१५ पासून सरकारने प्रथमच संपूर्ण भारतात संविधान दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. या पूर्वी २६ नोव्हेंबर राष्ट्रीय विधी दिवस म्हणून साजरा केला जात होता. अनेक विकसित देशांच्या संविधानांचा अभ्यास करून तयार करण्यात आलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वात लांब लिखित संविधान मानले जाते. भारतीय संविधानात नागरिकांची कर्तव्ये, मूलभूत हक्क, अधिकार यांचा उल्लेख असून प्रस्तावना, धर्मनिरपेक्षता, मार्गदर्शक तत्त्वे, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य, संघराज्य, कायद्याचे राज्य इत्यादी ठळक वैशिष्ट्ये म्हणून परिभाषित केली आहेत. भारतीय संविधान दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२६ नोव्हेंबर**

**१८५४ :-** अमेरिकन ख्रिस्ती मिशनरी रॉबर्ट विल्सन हयुम यांचे निधन. मराठी भाषा आत्मसात करून त्यातून प्रवचने ते देत. तसेच 'ज्ञानोदय' पाक्षिकाचे काही काळ संपादक होते. 'विचारकथन, लेकरांकरता चित्रांचे पुस्तक, मूर्तीचा उच्छेद, नारायण बाबांचा वृत्तांत, गुरू करण्याविषयी इ. पुस्तके लिहिली. **१८९४ : -** स्वातंत्र्यसेनानी, थोर तत्त्वचिंतक, गांधीवादी, राज्यशास्त्र आणि इतिहासाचे अभ्यासक लेखक शंकर दत्तात्रेय जावडेकर यांचा जन्म. 'लोकमान्य टिळक व महात्मा गांधी, आधुनिक राज्य मीमांसा, आधुनिक भारत' या ग्रंथातून त्यांच्या व्यासंगाची प्रचिती येते. रस्किनच्या 'अन् टु दि लास्ट' या ग्रंथाचा त्यांनी 'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र' असा अनुवाद केला. 'गांधीवाद व महात्मा गांधीचे जीवनदर्शन' या पुस्तकातून त्यांनी गांधीजींचे विचार, आचार आणि त्यांच्या कार्यपध्दती भाष्य केले आहे. याशिवाय 'लोकशक्ती' या वृत्तपत्राचे आणि 'साधना' या साप्ताहिकाचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केले. **१९४८ : -** लेखिका प्रा. वीणा विजय देव यांचा जन्म. ह्यांनी आपल्या वडिलांचा गो. नी. दांडेकरांच्या दहा निवडक कादंबऱ्यांवर दहा समीक्षात्मक लेख लिहिले. तसेच त्यांच्या कादंबऱ्यांवर अभिवाचनाचा कार्यक्रम सादर करतात. **१९४८:-** साहित्यिक, ललित लेखनकार यशवंत त्र्यंबक पाठक यांचा जन्म. 'नाचू कीर्तनाचे रंगी, ब्रह्मगिरीची सावली, मातीचं देणं' हे ललित लेखसंग्रह. 'नक्षत्रांची नाती' ही व्यक्तिचित्रे, 'स्पंदने श्रीसमर्थाची, तुकारामांचे अभंग, निरंजनाचे माहेर' ही समीक्षात्मक पुस्तके प्रसिध्द . कीर्तन परंपरेच्या सखोल अभ्यासातून 'नाचू कीर्तनाचे रंगी' हा ग्रंथ त्यांच्या हातून सिद्ध झाला. याशिवाय विविध दैनिके, नियतकालिकांतून विपूल प्रमाणात लेखन. 'आभाळाचे अनुष्ठान' हा कथासंग्रह तर 'अंगणातले आभाळ' हा त्यांचा आत्मकथनात्मक ग्रंथ प्रसिध्द, लेखणीबरोबर वक्तृत्वावरही हुकूमत असणाऱ्या पाठकांनी आपल्या वाणीतून संत जीवनाचे सार श्रोत्यांच्या मनात अलगदपणे उमटवलेत. **१९६०:-** लेखिका शुभदा दिवाकर मुंजे यांचा जन्म, 'अंधारवाटा', 'तुझे परतणे' ह्या काव्यसंग्रहासह 'उ:शाप मिळावा स्त्री जन्माला', 'एडस एक जागरण' या आरोग्य विषयक पुस्तकांसह 'हुंदका ओलावताना' हे आत्मकथन अशी साहित्य संपदा. **१९६५ :-** लेखक अनंत भोयर यांचा जन्म, 'मायाजाळ', 'हराळी', 'शिरान' या काव्यसंग्रहासह आकाशवाणीवरुन त्यांची अनेक कथा व नाटके प्रसारित झाली आहेत. **१९७७ :-** लेखक य. अ. खरे यांचे निधन. ह्यांनी कन्स्ट्रक्शन क्षेत्रात कार्यरत राहूनही साहित्यिक व तांत्रिक विषयावर लेख व व्याख्याने दिलीत. **१९८५:-** 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' ही गाजलेली कविता लिहिणारे राजकवी यशवंत तथा यशवंत दिनकर पेंढारकर यांचे निधन 'स्वातंत्र्य लक्ष्मीस मुजरा' या काव्यगायनाने कवी म्हणून लोकमान्यता. 'यशवंती' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर 'यशोधन', 'यशोनिधी', 'यशोगिरी' इ. काव्यसंग्रह व बंदिशाळा, जयमंगल इ. खंडकाव्ये प्रसिध्द. **१९९१ :-** अनुवादक व बालसाहित्यिक विश्वनाथ कृष्ण क्षेत्रीय यांचे निधन. 'राजा हर्ष', 'वेदांतील गोष्टी', 'रामायणसार इ. पुस्तके प्रसिद्ध. **२००१ :-** एकांकिका, नाटककार रमेश पवार यांचे निधन. **२००४ :-** 'शिवनेर' या वृत्तपत्राचे संस्थापक-संपादक विश्वनाथ बावळे यांचे निधन, **२००५ :-** गांधी हत्येतील एक आरोपी आणि 'गांधी हत्या व मी' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक गोपाळ विनायक गोडसे यांचे निधन. **२०११ :-** आपल्या खड्या आवाजाने अवघ्या महाराष्ट्राला 'जागे' करणाऱ्या लोकशाहीर विठ्ठल उमप नागपूर येथे दीक्षाभूमीवर निधन झाले. लॉर्ड बुध्दा' वाहिनीच्या लोकार्पण सोहळयासाठीते दीक्षाभूमीवर आले होते.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**साची निरव गडा, वाढदिवस विद्यानगर अलिबाग**



**कै. सुशीला दामोदर जाधव, स्मरणार्थ अलिबाग**

**२४-११-२०२४**
**डॉ. पद्मश्री बेनाडे, वाढदिवस**
**कै. नेहा महेंद्र गायकवाड, वाढदिवस, अलिबाग**


# कोकणात सागरी कासवांच्या विणीच्या हंगामाला प्रारंभ

**गुहागरच्या किनाऱ्यावर मिळाले पहिले घरटे**

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

सागरी कासवांच्या विणीचा हंगामातील पहिले घरटे कोकण किनारपट्टीवर गुहागर किनाऱ्यावर मिळाले आहे. वन विभागाच्या नोंदीनुसार रायगड जिल्ह्यातील ४, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी १५ किनाऱ्यांवर कासवांची घरटी सापडतात. हिवाळ्याच्या तोंडावर कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन सागरी जिल्ह्यांमध्ये दरवर्षी सागरी कासवांची वीण होते.

नोव्हेंबर ते मार्च हा सागरी कासवांचा विणीचा हंगाम असतो. या कालावधीत समुद्री कासवांमधील ऑलिव्ह रिडले प्रजातीच्या माद्या अंडी घालण्यासाठी येतात, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही किनाऱ्यांवर ग्रीन सी कासवांची घरटी देखील सापडली आहेत. यंदापासून कासव संवर्धनाच्या कामाच्या नियोजनाची संपूर्ण जबाबदारी कांदळवन कक्षाच्या खांद्यावर असणार आहे.सागरी कासवांच्या विणीसाठी प्रसिद्ध असलेल्या गुहागरच्या किनाऱ्यावर राज्यातील सागरी कासवांची सर्वात जास्त घरटी आढळतात. सहा किलोमीटर लांबीच्या या किनाऱ्यावर गेल्यावर्षी २९८ घरटी आढळून आली होती.



यंदाच्या हंगामातील पहिले घरटे शुक्रवारी सकाळी गुहागरच्या किनाऱ्यावर आढळल्याची माहिती रत्नागिरीच्या विभागीय वनअधिकारी गिरिजा देसाई यांनी दिली. यामध्ये आढळलेल्या ११७ अंड्यांना कासवमित्रांनी हॅचरीमध्ये सुरक्षित हलविल्याचे त्यांनी सांगितले.तीन हॅचरीम धून कासव संवर्धनगुहागर किनाऱ्यावर सहा कासवमित्रांच्या मदतीने कासव संवर्धनाचे काम होते. यासाठी दोन हॅचरी तयार करण्यात येतात. मात्र, गुहागर किनाऱ्यावर कासवांची घरटी सापडण्याची वर्षागणिक वाढणारी संख्या लक्षात घेता, तीन हॅचरी बांधून कासव संवर्धनाचे काम करणे आवश्यक आहे.

गेल्यावर्षी कोकण किनारपट्टीवरून समुद्री कासवांची १ लाख ५८ हजार ८७३ पिल्ले समुद्रात सोडली होती. तीन सागरी जिल्ह्यांमध्ये कासवांची २ हजार ५६६ घरटी आढळली होती आणि पिल्लांच्या जन्म होण्याचा दर ६४ टक्के होता. हा दर यंदाही कायम आहे.

# जामसंडे येथे तालुकास्तर विज्ञान प्रदर्शन

**। देवगड । प्रतिनिधी ।**

येथील पंचायत समिती शिक्षण विभाग आणि जामसंडे येथील श्री. मो. गोगटे माध्यमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन मंगळवारी (दि.२६) ते बुधवार (दि.२४) या कालावधीत सकाळी ९.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत जामसंडे येथील श्री. मो. गोगटे माध्यमिक विद्यामंदिरमध्ये आयोजित केले आहे. विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हा आहे. या प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामधील विद्यार्थी तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर विज्ञान प्रतिकृती मांडणार आहेत. सलग दोन दिवस चालणाऱ्या या विज्ञान प्रदर्शनात मंगळवारी प्राथमिक गट व माध्यमिक गट अशा दोन गटांमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा होणार आहेत. बुधवारी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यार्थी प्रतिकृती, शिक्षक प्रतिकृती, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर प्रतिकृती यांच्या प्रतिकृतींचे परीक्षण होणार आहे. तालुक्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी विज्ञान प्रदर्शनात सहभाग घ्यावा. सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ व विज्ञानप्रेमींनी विज्ञान प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्रीरंग काळे, मुख्याध्यापक संजय गोगटे यांनी केले आहे.

# शिक्षणातील बदलेली प्रणाली आत्मसात करा

**ज्ञानदा शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष बुलंद पटेल यांचे प्रतिपादन**

**। कणकवली । प्रतिनिधी ।**

बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणातील प्रणाली बदलत आहे. मुलांना नव्या तंत्रज्ञानाची ओळख होत आहे. बदलणारी शिक्षणातील ही नवी प्रणाली आत्मसात करायला हवी, असे प्रतिपादन वरवडे येथील ज्ञानदा शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष बुलंद पटेल यांनी केले.

वरवडे येथील ज्ञानदा शिक्षण संस्थेच्या आयडियल इंग्लिश स्कूलमध्ये भगीरथ प्रतिष्ठानतर्फे डिजिटल बोर्ड प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी प्रशालेचे सल्लागार डी.पी तानावडे, मुख्याध्यापिका अर्चना शेखर देसाई, माड्याची वाडी नेरुरचे मुख्याध्यापक अनंत सामंत, अत्तार, मालवणकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन बुलंद पटेल यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात भगीरथ प्रतिष्ठानची प्रशालेला डिजिटल बोर्ड देण्याची संकल्पना काय आहे. याबाबत अनंत सामंत यांनी माहिती दिली. ते म्हणाले, संस्थाध्यक्ष डॉ. प्रसाद देवधर यांची भगीरथ प्रतिष्ठान ही संस्था असे उपक्रम जिल्हाभरात राबवत आहे. अनेक शाळांमध्ये याचे मार्गदर्शन दिले जाते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक अत्तार यांनी शिक्षकांना डिजिटल बोर्डवर विविध शिक्षण सामुग्री तयार करण्याची आणि सादर करण्याची महत्त्वपूर्ण कौशल्य शिकवले. डिजिटल बोर्डचा वापर विद्यार्थ्यांचा लक्ष वेधून घेणारी शिकवणी आणि संवादात्मक पद्धती साकारण्यात मदत करतो. त्यांना अधिक सृजनशील बनवू शकतो, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमासाठी दाभोळ हायस्कूलचे मुख्याध्यापक सोन्सूरकर, करुळ हायस्कूलचे जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्ञानदा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विद्याधर तायशेटे, उपाध्यक्ष उपाध्यक्ष मोहन सावंत, संस्थापक सचिव प्रा.हरिभाऊ भिसे, सहसचिव प्रा.नीलेश महिंद्रकर, खजिनदार शीतल सावंत यांनी शुभेच्छा दिल्या. बांदल यांनी सूत्रसंचालन केले.

# मालगुंड बौद्धवाडीत २६ रोजी संविधान दिनानिमित्त कार्यक्रम

**रत्नागिरी :** मालगुंड बौद्धवाडी येथील धम्मचेतना बुद्ध विहारात २६ नोव्हेंबरला भारतीय संविधान दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमात भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान पुस्तिकेला अभिवादन करण्यात येणार असून भारतीय संविधानाची प्रस्तावना व प्रतिज्ञा ग्रहण केली जाणार आहे. तसेच धार्मिक पूजापाठाने महामानवांना अभिवादन करण्यात येणार आहे. या वेळी या कार्यक्रमात रत्नागिरी येथील त्रिरत्न बौद्ध महासंघाचे धम्मचारी सत्यसागर यांचे प्रबोधनपर मार्गदर्शन होणार आहे. हा कार्यक्रम मालगुंड येथील बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक १७ चे अध्यक्ष रविकांत पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी शाखेचे पदाधिकारी व महिला मंडळ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# अमूर ससाणा ५ दिवसांनी सोमालियात

**रेडिओ टॅगिंगचा प्रकल्प ; पक्ष्यांचा मार्ग आणि पर्यावरणीय बाबींचा अभ्यास**

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

उपग्रहाद्वारे टॅग केलेल्या दोन अमूर ससाण्यांपैकी एकाने गुहागर समुद्र किनाऱ्यावरून हवेत झेप घेतली. तो तब्बल ५ दिवस १७ तासांच्या अथक प्रवासानंतर अरबी समुद्रातून पार सोमालियात मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचल्याची नोंद झाली आहे.

वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार, अमूर ससाण्याला संरक्षित पक्षी म्हणून मान्यता देण्यात आली आहे. हे पक्षी आग्नेय आशिया आणि ईशान्य चीन यामध्ये प्रजननाच्या ठिकाणी उन्हाळ्याचा ऋतू घालवतात. हे पक्षी आफ्रिकेतील मैदानांवर हिवाळ्यात राहणे पसंत करतात.

या पक्ष्यांच्या परतीचा प्रवास एप्रिल-मे मध्ये अफगाणिस्तान आणि पूर्व आशियामधून सुरू होतो. सुमारे २० हजार किलोमीटरचा वार्षिक प्रवास हे पक्षी करतात.

**अमूर ससाण्यांना रेडिओ टॅग मणिपूर वनविभागाच्या वन्यजीव संस्था व रहिवाशांनी ८ नोव्हेंबरला २ अमूर ससाण्यांना रेडिओ टॅग केले. हे जगातील सर्वात लांब प्रवास करणारे पक्षी आहेत. उपग्रह टॅग असलेली आणखी एक अमूर ससाणा निरीक्षणाखाली आहे.**

ते भारताच्या ईशान्य क्षेत्रात तसेच सोमालियामध्ये थांबतात.

मणिपूरच्या तामेंगलाँग जिल्ह्यातील एका गावाच्या नावे दोन अमूर ससाणा पक्ष्यांना उपग्रहाद्वारे टॅग करण्यात आले. पक्ष्यांच्या स्थलांतरांच्या मार्गावर वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया ही संस्था लक्ष ठेवत असते. या संस्थेचे शास्त्रज्ञ सुरेश कुमार म्हणाले, चिअलिआन दोनने रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे विनाथांबा प्रवास सुरू केला. हा पक्षी सोमालिया येथे पोहोचला. स्थलांतरित पक्ष्यांचा मार्ग आणि तामिंगलाँगमधील पर्यावरणीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

चिअलिआन आणि वाँगग्राम ही तामिंगलाँग जिल्ह्यातील अमूर ससाण्यांची मुक्कामांची गावे आहेत. मणिपूर वनविभागाने ८ नोव्हेंबरला आणखी ९ अमूर ससाणा पक्षी सोडले. १९१८ मध्ये रेडिओ टॅगिंगचा प्रकल्प पहिल्यांदा हाती घेण्यात आला.

२०१९ मध्ये ५ पक्ष्यांना असे टॅगिंग करण्यात आले होते. कबुतराच्या आकाराचे असलेले हे पक्षी नागालँड आणि मणिपूरसह ईशान्य भारतात ऑक्टोबरमध्ये येतात. आफ्रिकेत जाण्यासाठी प्रवासासाठी पुरेसे अन्न मिळाल्यानंतर ते नोव्हेंबरमध्ये हा प्रदेश सोडतात.

# अध्यापक प्रशिक्षण कार्यशाळा रत्नागिरीत

**रत्नागिरी :** कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांचे भारतरत्न डॉ पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्र रत्नागिरी उपकेंद्र आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्यावतीने दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान अध्यापक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यशाळेची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५.३० अशी असेल. या कार्यशाळेला महाराष्ट्रातून विविध शाखेतील अध्यापक आणि प्राचार्य वर्ग उपस्थित राहणार आहे. तसेच या ५ दिवसांच्या कार्यशाळेत विविध तज्ञ आणि अनुभवी आरोग्य क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात खास करून कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रो हेराम त्रिपाठी उपस्थित राहणार आहे.

# जनशताब्दी एक्स्प्रेसचे वेळापत्रक विस्कळीत

**कणकवली :** कोकण रेल्वे मार्गावरील अतिजलद जनशताब्दी एक्स्प्रेसचे परतीच्या प्रवासाचे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. गेले काही दिवस ही गाडी उशिरा मुंबईला पोहोचत आहे. आज तब्बल दोन तास उशिराने जनशताब्दी एक्स्प्रेस धावत होती. कोकण रेल्वे मार्गावर मडगाव ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल अशी नियमित जनशताब्दी एक्स्प्रेस धावते. मुंबई येथून पहाटे पाचला सुटून मडगावला दुपारी अडीचला पोहोचते. परतीच्या प्रवासासाठी मडगाव येथून दुपारी तीन वाजता सुटून पुन्हा मुंबईला रात्री बारा वाजता पोहोचते. परंतु, सध्या ही गाडी एक ते दोन तास उशिराने धावत आहे. त्यामुळे मुंबईत पोचणाऱ्या प्रवाशांना रात्री दोन वाजेपर्यंत आपले घर गाटावे लागते. यामुळे या गाडीला प्रतिसाद कमी मिळू लागला आहे. प्रवाशांची नाराजी सुद्धा आहे. त्यामुळे या गाडीच्या वेळापत्रकात बदल करावा अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# रेवदंड्यात श्री काळभैरव उत्सव साजरा

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

रेवदंडयातील भाविकांचे श्रध्दास्थान व भक्तीस्थान असलेल्या श्री काळभैरवाचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. रेवदंडा गोळा स्टॉपनजीक हरेश्वर मंदिराशेजारी असलेले श्री काळभैरव मंदिर जागृत देवस्थान म्हणून प्रसिध्दीस आहे.सालाबाद प्रमाणे रेवदंडा गोळा स्टॉप हरेश्वर मंदिर येथे श्री काळभैरव उत्सव शनिवारी (दि. २३) संपन्न झाला. रेवदंडाश्री काळभैरव मित्रमंडळ व रेवदंडा योगेश्वरी महिला मंडळ यांचे विदयमाने हा उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवास रेवदंडा वपरिसरातील भाविकांनी मोठी गर्दी करून श्री काळभैरव दर्शनाचा लाभ घेवून महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच या प्रसंगी रांगोळी प्रदर्शन व रात्री मनोरंजनार्थ मैफिल सप्तसुरांची या संगित रजनीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री काळभैरव उत्सवाचे निमित्ताने मंदिरासभोवताली आकर्षक विदयुत रोषनाई करण्यात आली होती तसेच या निमित्ताने बनविण्यात आलेला मातीचा किल्ला पहाण्यास सर्वांचे आकर्षण ठरले. हा उत्सव यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी काळभैरव मित्रमंडळ अध्यक्ष वैभव चुनेकर, उपाध्यक्ष भगवान तांबडकर, सेक्रेटरी किरण चुनेकर, सहसेक्रेटरी वैभव नाईक, खजिनदार सुरेंद्र गोंधळी, सदस्य अंजनीकुमार तांबडकर,सदस्य राजेश चुनेकर, सदस्य अमित नाईक, सदस्य मिलिंद चुनेकर, सल्लागार शरद गोंधळी, सल्लागार तुकाराम चुनेकर, सल्लागार यशवंत पिटनाईक आदीसह योगेश्वरी महिला मंडळ तसेच युवा व युवती वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.



# खेड रेल्वेस्थानक सुशोभिकरण अपूर्ण

**। खेड। प्रतिनिधी ।**

येथील रेल्वेस्थानक सुशोभिकरणासह रस्ताकामाचेही लोकापर्ण करण्यात आले; परंतु दीड महिना झाला तरीही सुशोभिकरणाचे काम अपूर्णच आहे तसेच सर्वत्र अस्वच्छता असल्यामुळे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. या भागातील स्वच्छतेची जबाबदारी नेमकी कुणाची, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

रेल्वेस्थानकाच्या सुशोभिकरणासह रस्ता काँक्रिटीकरणासाठी ९ कोटी ९० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम खात्याच्या देखरेखीखाली सुशोभिकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले; मात्र कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. खेड रेल्वेस्थानक सुशोभिकरणाच्या लोकार्पणानंतर दोन ते तीनवेळा झालेल्या मुसळधार पर्जन्यवृष्टीत छताला गळती लागली होती. त्यामुळे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप करत ठेकेदारांवर कारवाईची मागणीही केली गेली. त्यानंतरही कामाचा दर्जा राखण्यासाठी प्रशासनाकडून कुठल्याच ठोस उपाययोजनांचा अवलंब करण्यात आलेला दिसून येत नसल्याने दर्जाबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे.




स्थानक परिसरात एकीकडे सुशोभिकरणामुळे सुटसुटीतपणा आलेला असतानाच दुसरीकडे अस्वच्छता आहे. लोकार्पणापासून सुशोभिकरण परिसराची स्वच्छताच केलेली नाही. त्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागतो. विद्युत उपकरणांसह अन्य साहित्यही परिसरात टाकून ठेवलेले आहे. परिसरातील स्वच्छता नेमकी करायची कुणी, असा प्रश्न उपस्थित केला जात असला तरी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या देखरेखीखाली काम करण्यात आल्याने स्वच्छतेची जबाबदारीदेखील त्यांचीच असल्याचा सूर आळवला जात आहे.

**लोकार्पणानंतरही स्वच्छतेकडे दुर्लक्ष; उर्वरित कामांची गतीही मंदावलेली**

**एका बाजूकडील कामे अपूर्ण**

**रेल्वेस्थानकाच्या आवारात रेल्वे इंजिनची कलाकृती, राष्ट्रीय पक्ष मोर, शिवसृष्टीसह लक्षवेधी कलाकृती, रिक्षा व्यावसायिकांसह प्रवाशांच्या दुचाकींसाठी, चारचाकी वाहनांसाठी तसेच कर्मचाऱ्यांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था यामुळे तब्बल २९ वर्षांनी स्थानकाचा पूर्णपणे कायापालट झाला; मात्र सुशोभीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असतानाही लोकार्पणाची घाई करण्यात आल्याने सद्यःस्थितीत प्रलंबित कामे मंदगतीने सुरू आहेत. एका बाजूकडील काम पूर्णतः अर्धवट आहे.**

# रत्नागिरी नगर वाचनालयाच्या इमारतीला नवा साज

**पुनर्बांधणीच्या कामाला प्रारंभ ; तीन कोटीचे अंदाजपत्रक**

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी नगर वाचनालयाच्या इमारतीला नवा साज देण्याचे काम सुरू आहे. सध्या पुनर्बांधणीचे काम सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी दिली.

सध्या जुनी इमारत पाडण्याचे काम सुरू झाले आहे. नवीन बांधकाम डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून करण्याचे नियोजन आहे. या दुमजली बांधकामासाठी ३ कोटीचे अंदाजपत्रक तयार केले असून, त्यापैकी १ कोटीची रक्कम आजपर्यंत जमा करण्यात आली आहे. उर्वरित दोन कोटी उभे करण्याचे काम सुरू आहे, असे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले.

बहुआयामी उपक्रम ज्या वास्तूमध्ये होत होते ती वास्तू जुनी झाली. त्यामुळे ही वास्तू पाडून तिथे नवीन वास्तू उभी राहणार आहे. वाचनालयाची जागा शासनाकडून लीज ॲग्रीमेंटने २०४८ पर्यंत १ रुपया प्रति चौ. मी. दराने प्राप्त करण्यात प्रदीर्घ प्रयत्नानंतर यश प्राप्त झाले. लगेच बांधकाम परवानगीही मिळाली. त्यानुसार ११ हजार ५०० चौरस फुटाचे बांधकाम करण्यासाठी नियोजन सुरू आहे.

या वाचनालयास २०२८च्या जानेवारीमध्ये २०० वर्ष पूर्ण करताना वाचनालयाची नवी वास्तू परिपूर्णपणे उभी राहावी यासाठी भरीव आर्थिक योगदानाची आवश्यकता आहे.

पुढील विचार करुन वास्तूची उभारणीवाचनालयाची इमारत उभी करण्यासाठी आर्थिक मदत विविध स्तरावरून गोळा केली जात आहे. त्यासाठी देणगीदारांची नावे वाचनालयाच्या कक्षाला किंवा स्वतंत्र विभागालाही दिली जाणार आहेत.

सरस्वतीचे ग्रंथमंदिर उभे करण्यासाठी मदतीचा हाथ मिळावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. वाचनालयाची पुढील १०० वर्षांची वाटचाल दिमाखदार होण्यासाठी ही नवीन वास्तू उभी करणे आवश्यक आहे. त्या नवनिर्मितीसाठी बहुमोल आर्थिक योगदान अत्यावश्यक आहे, असे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले.

# संगमेश्वर ग्रामीण भागातील प्रेक्षकांना नाटकांची प्रतीक्षाच


**तेरा वर्षात नाट्यप्रयोग नाही; बीग बजेटमुळे प्रयोग अशक्य**

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

कोकणात गावागावामधील प्रेक्षकांना नाटकांची कमालीची आवड आहे. एकेकाळी बैलगाडीने प्रवास करीत संगमेश्वर येथील माजी विद्यार्थी रंगमंचावर नाटक पाहण्यासाठी रसिक येत होते. मागील तेरा वर्षात एकही नाटक या रंगमंचावर झाले नाही. कलाकारांचे वाढलेले मानधन आणि वाढते खर्च यामुळे नाट्यप्रयोगांचे बजेट वाढले आहे.

परिणामी तोटा सहन करण्यापेक्षा नाट्यसंयोजकांनी शहरांव्यतिरिक्त अन्य ठिकाणी नाट्य प्रयोग करणे बंद केले आहे. त्याचा फटका रंगभूमीशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या कोकणच्या नाट्यवेड्या रसिकांना बसत आहे.

ग्रामीण भागातील जत्रा अथवा अन्य उत्सवाची सांगता आजही स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगांनी होत असते. केवळ कौटुंबिकच नव्हे तर, संगीत नाटकांतील गाजलेल्या अजरामर नाटकांचे प्रयोग सादर करण्याचे धाडस रत्नागिरी जिल्ह्याच्या विविध तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये असणारे कलाकार करत असतात. मराठी रंगभूमीला कोकणने नामवंत कलाकार दिले. यासर्व कलाकारांनी आपल्या गाजलेल्या भूमिकांतून नाटक सातासमुद्रापार नेले.



हेच कलाकार ज्यावेळी कोकणात प्रयोग सादर करायला येत असत त्यावेळी त्यांच्या मनात रंगभूमी विषयी कृतज्ञता असे. यामुळे रत्नागिरी जिल्ह्याच्या रंगमंचावर अनेक नाटके गाजली असून त्याकाळच्या प्रेक्षकांच्या मनात त्या आठवणी आजही ताज्या आहेत.

ग्रामीण भागातील नाटक सादर होण्याच्या उत्साहात देखील आता घट होवू लागली आहे. संगमेश्वर तालुक्यात खुद्द संगमेश्वर येथे व्यापारी पैसा फंड संस्थेचे माजी विद्यार्थी रंगमंदिर हा रंगमंच आहे. याची उभारणी संस्थेने १९६९ साली केली. त्या सालापासून सुरु झालेली या रंगमंचावरील नाटके अगदी २०११ पर्यंत जवळजवळ ४० ते ४२ वर्षे सुरु होती. अनेक दिग्गज कलाकारांनी या रंगमंचावर आपल्या अजरामर भूमिका सादर केल्या.

आता मात्र प्रेक्षकांना या रंगमंचावर नाटक पाहायला मिळणे अशक्य झाले आहे. पूर्वी आर्केस्ट्रा आणि जादूचे प्रयोग वर्षातून किमान एक दोन वेळा तरी येत असत. आता ते देखील येत नसल्याने संगमेश्वर येथील माजी विद्यार्थी रंगमंदिराला करमणूकीच्या प्रयोगांची प्रतिक्षाच करावी लागत आहे.

सहा वर्षांपूर्वी पर्यंत दरवर्षी हम खास पोलीस मदत निधीसाठी प्रयोग होत होते. आता हे प्रयोग देखील काही कारणाने प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीत घेणे बंद करण्यात आले आहे.

तालुक्याच्या ठिकाणी देवरुख येथे पित्रे प्रायोगिक कलामंच हे कै. बाळासाहेब पित्रे यांनी उभारलेले नाट्यगृह आहे. हे नाट्यगृह बंदिस्त असले तरी, याची आसन क्षमता कमी असल्याने मोठ्या बजेटचे नाटक येथे लावणे संयोजकांना परवडत नाही. परिणामी देवरुख येथेही नाट्यप्रयोग होत नाहीत.

> **कोकणात जवळपास २५ वर्षे आपण नाट्य व्यवसाय केला. येथील प्रेक्षक खूपच नाटक वेडा असल्याने घरातील पूर्ण कुटूंबच नाटकांना लोटत असे. त्याकाळी नाटक निर्मितीचा खर्च, कलाकारांचे मानधन आणि अन्य खर्च आवाक्यात होते. कालांतराने कलाकारांच्या मानधनात कमालीची वाढ झाली आणि नाटक निर्मितीचे तसेच अन्य खर्च वाढल्याने पूर्वी १८ ते २० हजारात होणारा नाट्यप्रयोग आता ८० हजार ते एक लाखाच्या घरात गेला. खेड, चिपळूण येथील नगरपालिका नाट्यगृह बंद असल्याने सलग प्रयोग करुन नुकसान भरुन काढता येत नाही.**
> **- विकास पावसकर, नाट्य संयोजक.**

# रायगडात माकडांचा उपद्रव

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी । रायगडात माकडांनी मोठा उच्छाद मांडला आहे. या माकडांच्या वाढलेल्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. आंबा, काजू बागांसह फळपिकांचे नुकसान करणाऱ्या माकडांना पकडण्याची मोहीम आंबा हंगाम सुरू होण्याआधी करण्यात येणे गरजेचे आहे.**

- **पिकांचे नुकसान बागायतदार झाले त्रस्त**
- **मुरुड शहरात, बाजारपेठेत, घरात घुसून खाण्याच्या वस्तू करतात गायब**

रायगडात मुरुड, रोहा, श्रीवर्धन, दांडगुरी, खारआंबोळी परिसरातील बागायतदार व शेतकरी माकडांच्या त्रासाला कंटाळले आहेत. मुरुडमध्ये नारळाच्या झाडाला कोंब फुटून छोटे नारळ बाहेर येताच माकडे खातात. त्यामुळे नारळ मोठा होत नसल्याने नुकसात होत आहे. येणाऱ्या थंडीत आंब्याला मोहर येणार आहे. त्यानंतर आंबा कैरी रूपात असताना माकडाचे वादळ आले तर आंब्याचे पीक नष्ट होईल. त्यासाठी वनखात्याने आताच उपाययोजना करावी अशी मागणी बागायतदार करत आहेत

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आंबा आणि काजू याबरोबर इतर फळांचे उत्पन्न घेतले जाते. याबरोबर भाजीपाला व भात शेती कोकणात केली जाते. मात्र गेली काही वर्ष फळबागा आणि शेतीपिकांचे माकडांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी आणि बागायतदार हवालदिल झाला आहे. दरवर्षी त्याला मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. परंतु हा प्रश्न सोडवण्यासाठी दांडगुरीचे आदर्श शेतकरी शरद खेडेकर यांनी वनखात्यात अनेक वेळा तक्रार करूनही वनखात्याकडून कारवाई होताना दिसत नाही.

बागायतदारांनी माकड, वानरांपासून होणाऱ्या उपद्रवाबद्दल आवाज उठवण्याची गरज आहे. वनखात्याने माकडांच्या उपद्रवासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

मुरुड शहरात बाजारपेठेत रोज सकाळी सात वाजता घरच्या छपरावर वीस पंचवीस माकडे असतात एक झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारत कर्कश आवाज करत व घराची खिडकी उघडी असली तर घरातील खाण्याच्या वस्तू उचलू खातात घरातील महिला लहान मुले भयभीत झाले आहेत. नागरिकांना दरवाजे बंद करून घरी बसावे लागत आहे.



मुरुड खारआंबोळी, वनदे, आगरदांडा परिसरात माकडांप्रमाणे डुकरांचा अतिशय त्रास आहे. भातशेती पिकली कि डुकरांचे झुंड येतात उभे पीक आडवे करून जातात. एकावेळी २० डुकरे शेतात कुंपण तोडून शिरतात नासधूस करून पसार होतात. झालेल्या नुकसानीसाठी शेतकरी शासनाकडे मागणी करतात. परंतु अत्यल्प मदत मिळते म्हणून निराश होतात. शासन शेतकऱ्यांची खरी मदत कधी करणार

– मनोज कमाने, (मुरुड,शेतकरी)

श्रीवर्धन तालुक्यत आंबा, काजू, नारळ आणि सुपारीच्या बागा मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु गेली वर्षभर माकडांचे झुंड मानव वस्तीत येऊन अतिशय नासधूस करत आहेत. नारळ, सुपारी ,आंबा, काजू पीक हाताशी येताच माकडे खाऊन टाकतात .माकडे इतकी चपळ आहेत कि, फटाके लावूनदेखील पळत नाहीत यावर वनखात्याने लक्ष देण्याची गरज आहे. मुख्य म्हणजे जंगलात फळ देणारी झाड नसल्यामुळे माकडे शहराकडे वळतात. वनखात्याने सर्वच जंगलात फळ देणारी झाडाची लागवड करण्याची गरज आहे. उंबर, पेरू, आवळा, काजू अशी झाडे लावण्यासाठी शासनाने अनुदान देण्याची गरज आहे. त्यासाठी जनतेचे सहकार्य घ्या. बागायतदारांचे झालेल्या नुकसानभरपाईचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदतीचा हात पुढे करा.

शरद खेडकर (आदर्श शेतकरी )

मुरुड परिसरात माकडांचा वावर वाढला आहे .त्यापासून बागांचे नुकसान होत असल्याचे समजते परंतु असा त्रास असल्यास मुरुड वनविभागाला कळवावे ,तातडीने कार्यलयात कर्मचाऱ्यांना पाहणीसाठी पाठवण्याची सोया करण्यात येईल .वाघमारे म्हणले माकड दिसले कि पर्यटक त्याला खायला देतात ते न देता जागृत होऊन हाकलण्याचा पर्यत करावा ,शासन जंगलात फळझाडे लावण्याचा प्रयत्न करेल.

मनोज वाघमारे (वनक्षेत्रपाल) मुरुड

# साजगाव यात्रेत लाखोंची उलाढाल

**। खोपोली । वार्ताहर ।**

साजगाव-ताकई येथे विठ्ठल मंदिर परिसरात कार्तिकी एकादशीपासून बोंबल्या विठोबाची यात्रा सुरू आहे. सतत १५ दिवस चालणारी कोकण विभागातील ही एकमेव मोठी यात्रा आहे. शनिवार, रविवारी यात्रेत मोठी गर्दी होत असल्याने लाखोंची उलाढाल होत आहे. सौंदर्य प्रसादनांची दुकाने, खाऊ गल्ली, मिठाई व सुकी मासळी खरेदीसाठी गर्दी होत असल्याने व्यापारीवर्गात समाधान होते.

यात्रा परिसरात येणाऱ्या भाविकांमुळे संध्याकाळी वाहतूक कोंडी होत होती. धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या साजगाव यात्रेचा दुसरा आठवडा सुरू आहे. विधानसभा मतदान पार पडल्यानंतर शुक्रवारपासून मोठ्या प्रमाणावर यात्रेकरूंची गर्दी झाली होती. शनिवारी तर यात्रेत पाय ठेवायलाही जागा नाही, अशी स्थिती होती. रविवारीही गर्दी कायम राहिल्याने स्थानिक पोलिस प्रशासन, वाहतूक शाखेकडून खास नियोजन करण्यात आले होते. रविवारी सुटीचा दिवस असल्याने सकाळपासूनच गर्दी झाली होती. दोन दिवसांत मालाची मोठ्या प्रमाणात विक्री झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये उत्साह होता. यात्रेतील उंच उंच पाळणे, रोमहर्षक खेळ, खाऊ गल्ली, खेळणी बाजार, मिठाई व सुक्या मासळीचा बाजार सर्वांचे आकर्षण ठरत आहे. साजगावच्या यात्रेत सुकी मासळी खवय्यांसाठी पर्वणी ठरते. खोपोली शहर, पनवेल, पाली-सुधागड, पेण, खालापूर-कर्जत तालुक्यातील व घाटमाथ्यावरील हजारो कुटुंब व नागरिक या यात्रेत खास सुकी मासळी खरेदी करण्यासाठी येतात. यात्रेच्या शेवटच्या दिवसांत सुकी मासळी बाजारात मोठी उलाढाल होते. गर्दीच्या काळात कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी खोपोली पोलीस, यात्रा समिती, नगरपालिका प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.

प्रत्येक दुकानाचा दररोजचा व्यवसाय एक लाखाच्या घरात होतो. शेवटच्या दोन-तीन दिवसांत यात वाढ होऊन साधारण सरासरी चार-पाच लाखांच्या आसपास व्यवसाय जाईल, असे यात्रेतील मासळी व्यावसायिकांनी सांगितले.

# महावितरणवर गुन्हा दाखल करावा

## ■ धर्मेंद्र पाटील यांचे नेरळ पोलिसांना पत्र

**। नेरळ। प्रतिनिधी ।**

नेरळ येथे क्रिकेट खेळताना महावितरणचे वीज रोहित्र यांच्या उघड्या बॉक्समध्ये चेंडू गेला. तो चेंडू काढताना १६ वर्षीय मुलाला विजेचा धक्का बसला होता. या प्रकरणी महावितरण वर ठपका ठेवून गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी पालक धर्मेंद्र पाटील यांनी नेरळ पोलिसांना निवेदन देवून केली आहे.



नेरळ गावातील कुंभारआळी भागातील बापूराव धारप सभागृहासमोर महावितरणच्या विजेचे रोहित्र आहे.लागूनच असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर क्रिकेट खेळत असताना हरवलेला चेंडू शोधताना १३ वर्षीय मुलगा वीज रोहित्राचा धक्का लागून जखमी झाला. मात्र, सदर मुलगा दीड मिनिटे त्याला चिटकून राहिला अन् जखमी झाला. त्याच्यावर बदलापूर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मनीष पाटील असे या बालकाचे नाव आहे. विजेचा धक्का लागलेल्या मुलावर बदलापूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर आहे.सदर मुलाचे वडील हे नेरळ गावातील दत्तमठामध्ये पुजारी असून ते बदलापूर येथील आहेत. त्यांनी या अपघाताबाबत महावितरणवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवला आहे. तसेच,संबंधी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. त्या ठिकाणी आणि अन्य ठिकाणी असे अपघात होऊ नये यासाठी त्याठिकाणी उपाययोजना करण्याचे त्यांनी सूचवले आहे.



मुरुड किनाऱ्यावर सलग सुट्टी असल्याने समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांनी पोहण्याचा आनंद घेतला.

(छायाचित्र : सुधीर नाझरे)

# फुटबॉल आवारात भीषण आग

**पनवेल** : खारघरमधील फरशीपाडा सेक्टर ३४ इंटरनॅशनल फुटबॉलच्या आवारात भीषण आग लागली होती. यावेळी रमजान शेख हे आपल्या कार्यालयातून घरी जात असताना त्यांनी हे दृश्य पाहिल्यानंतर त्यांनी तत्काळ सिडको अग्निशमन दलाला फोन करून तातडीने येण्यास सांगितले.

जास्त वेळ वाया न घालवता सिडको अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून काही वेळातच आग आटोक्यात आणली. यावेळी मदतीसाठी मिराज शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग क्रमांक ३ अध्यक्ष शेहबाज शेख, सोहेल शेख आदी उपस्थित होते. वेळ वाया न घालवता आग विझवण्यात सिडको अग्निशमन दलाने तत्पर सहकार्य केल्याबद्दल रमजान शेख यांनी सिडको अग्निशमन दलाचे आभार मानले.

# कारची पिकअप गाडीला धडक ; २ जखमी

**। पनवेल । वार्ताहर ।**

कारवरील ताबा सुटल्याने कारचालकाने पुढे जाणाऱ्या पिकअपला पाठीमागून ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात दोघेजण जखमी झाले आहेत. या अपघातात वाहनाचे नुकसान झाले आहे. मुंबई- पुणे एक्स्प्रेस वे मुंबई लेनवर किमी २.६०० येथे खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत हा अपघात झाला .




टेम्पो पिकअप ( क्र. एम एच ४६ बीएम ६९९८) वरील चालक मच्छिंद्र नामदेव जाधव (वय ६५ रा. सेक्टर १४ कळंबोली) हे कळंबोली ते पनवेल असे जात असताना पुणे लेन किमी २/६०० या ठिकाणी तिसरे लेन वरून पहिल्या लेनला घेऊन जात असताना मागून येत असणारी स्विफ्ट कार (क्र.एम एच ०३ डिव्ही ०८१४) वरील चालक बालाजी आंधळे (वय ३० रा. लोणी जि.पुणे) यावरील चालक याचा कार वरून ताबा सुटल्याने पुढील पिकअपला पाठीमागून धडक मारली. या अपघातात दोघे जण जखमी झाले. या ठिकाणी वाहतूक पोलीस व पळस्पे मोबाईल कर्मचारी व आयआरबीचे कर्मचारी हजर होते. कार अपघातातील जखमी शुभम सिंग व अंकिता सिंग यांना डोक्याला व मानेला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना आयआरबी रूग्णवाहिकेने एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे पाठवण्यात आलेले आहे.

# आरोग्यवर्धक पांढरे वांगे बाजारात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील शेतकरी संजय पाटील हे हौशी शेतकरी म्हणून ओळखले जातात.बँकेत नोकरी करून नंतर सुट्टीच्या वेळेत शेती करणारे संजय पाटील यांनी आपल्या कुरुंद गावी वांग्याची शेती केली आहे.त्यांनी चक्क देठ वगळता अन्य भाग पांढरा भडक असलेल्या वांग्यांची शेती केली आहे.दरम्यान, आरोग्यवर्धक म्हणून हा पांढरा भडक वांगा गणला जातो आणि या वांग्याला पुसा पांढरा वांगे या नावाने ओळखले जात असून भारतीय शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे.

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मॅनेजर पदावर काम करणारे संजय पाटील हे ठाणे शहरात राहतात. मुलाचे भिवंडी तालुक्यातील कुरुन्द गावातील संजय पाटील हे शनिवार आणि रविवार आपल्या गावी असतात. शेतीची आवड असताना देखील नोकरीच्या निमीत्ताने बाहेर राहावे लागत असल्याने आपली शेती आवड जपण्यासाठी शनिवार आणि रविवार भिवंडी येथील शेतात रमणारे संजय पाटील हे एक छंद म्हणून वेगवेगळ्या प्रकारची शेती करतात.उन्हळ्यात भाजीपाला शेती तसेच काकडीचे मोठे पीक त्यांनी आपल्या शेती मध्ये घेतले आणि साधारण ३०० किलो काकड्या या आपल्या नातेवाईक आणि



मित्रांना खायला दिल्या होत्या. छंद जोपासत असलेले संजय पाटील हे व्यवसाय करण्यासाठी नाहीतर आपल्या कुटुंबाला सेंद्रिय खतांपासून पिकवलेले भाजीपाला मिळावा हा त्यांचा एकमेव उद्देश.पावसाळ्यात त्यांनी वांग्यांच्या विविध जाती तसेच मिरची आणि गवार यांची शेती केली आहे.

> **मी एक आवड म्हणून शेती करतो, त्यात यावेळी पांढऱ्या वांग्याबद्दल ऐकले होते आणि त्यानुसार पुसा पांढरा वांग यांची शेती केली आहे. दररोज दहा किलो वांगे या शेती मधून निघते. त्याची कोणतीही विक्री आम्ही करीत नसतो. आपल्या कुटुंबाचे लोक नातेवाईक आणि मित्र परिवार यांना भेट म्हणून पाठवत असतो. या शेतीसाठी शेण खत तसेच गोमूत्र यांचा वापर केल्याने सेंद्रिय वांगी आमच्या नातेवाईक यांच्यात लोकप्रिय बनली आहेत.**
> **– संजय पाटील, शेतकरी**

## शास्त्रीय फायदे...

**पांढरी वांगी अनेक पौष्टिक गुणधर्मांनी समृद्ध आहे. याव्यतिरिक्त, त्यात बी व्हिटॅमिन, फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम, तांबे यांसारख्या पोषक तत्वांचा भरपूर प्रमाणात समावेश आहे, जे शरीराला अनेक आरोग्य समस्यांपासून वाचवण्यास मदत करते. पांढऱ्या वांग्याचे सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होते.भारतीय कृषी संशोधन परिषद आणि भारतीय कृषी संशोधन संस्थेने अलीकडेच पूसा पांढरी वांगी हि जात शोधून काढली आहे.या पांढऱ्या भडक रंग असलेल्या पुसा पांढरा वांगे यात उच्च पोषक तसेच अँटिऑक्सिडेंट गुणधर्म असून हे वांगे पारंपारिक वाग्यांपेक्षा यांचे उत्पादन देतात.त्याचवेळी अँटिऑक्सिडेंट गुणधर्मांनी परिपूर्ण असून पारंपरिक वाग्यांपेक्षा ही वांगी जलद वाढतात.बायो केमिकल्सच्या दुष्परिणामांपासून अँटीऑक्सिडंट्स आपल्या शरीराचे रक्षण करतात.आपल्या शरीरात लाल रक्तपेशींची संख्या वाढवून ते रोग प्रतिकारशक्ती मजबूत करतात.त्याचवेळी पांढरा वांग्यामध्ये आपल्या अँटीऑक्सिडंट्स त्वचेला सूर्यापासून आणि सूर्याच्या हानिकारक किरणांपासून बचावासाठी जास्त प्रमाणात ऑक्सिजन शोषण्यास मदत करतात.**

# ६० वर्षीय महिलेची दुर्मिळ कर्करोग मात

**। पनवेल । वार्ताहर ।**

स्यूडोमायक्सोमा पेरीटोनी ओटीपोटाचा कॅन्सर आढळून आलेल्या एका ६० वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार केले. स्यूडोमायक्सोमा पेरीटोनी हा कर्करोगाचा अत्यंत दुर्मिळ प्रकार आहे. डॉ डोनाल्ड बाबू (सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, मेडिकवर हॉस्पिटल, नवी मुंबई) यांच्या नेतृत्वाखाली टिमने केमोथेरपी शस्त्रक्रिया केली असून रुग्णाचा जीव वाचविला.

रितू खुराना (नाव बदलले आहे) या नवी मुंबईतील रहिवासी असून पोटामध्ये सूज आल्याने तिच्या दैनंदिन कामात अडथळा येत होता. हळूहळू तिची प्रकृती ढासळू लागली आणि तिने खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटल येथे धाव घेत पोटदुखी, वजन कमी होणे आणि दोन महिन्यांत भूक न लागणे अशा समस्या मांडल्या.

डॉ डोनाल्ड बाबू सांगतात की, रुग्णालयात दाखल झाली तेव्हा तिचे वजन कमी झाले आणि दोन महिन्यांपासून भूक मंदावली होती आणि हळूहळू पोटाचा विस्तार होऊ लागला. यूएसजी आणि सीटी स्कॅनमध्ये उदरपोकळी जाड झाल्याचे दिसून आले. हे गंभीर आजाराचे लक्षण होते. स्यूडोमायक्सोमा हा एक ट्युमर आहे जो या उदर पोकळीत पसरतो आणि सामान्यतः ५० ते ७० या वयोगटात दिसून येतो. हा बहुतेक वेळा सौम्य ट्यूमर असतो आणि रक्ताद्वारे पसरू शकत नाही. घातक प्रकार देखील रक्ताद्वारे पसरत नाही, परंतु उपचारांसाठी केमोथेरपीची आवश्यकता असते.

डॉ. डोनाल्ड बाबू पुढे सांगतात की, प्यूडोमायक्सोमा पेरिटोनीची बायोप्सीद्वारेही खात्री करण्यात आली. पेरीटोनियल अस्तरातून उद्भवलेल्या या सौम्य ट्यूमरवर उपचार करण्यासाठी १२-१४ तासांच्या शस्त्रक्रियेद्वारे त्यावरील संपूर्ण अस्तर काढून टाकण्यात आले. शस्त्रक्रिया ही हायपोथर्मिक, इंट्रापेरिटोनियल, एक्झोथर्मिक केमोथेरपीमध्ये संपूर्ण पेरीटोनियल अस्तर काढून टाकणे आणि थेट उदर पोकळीमध्ये केमोथेरपी देण्यात आली. रूग्णाचा रूग्णालयातील कालावधी अनिश्चित होता, ३०० मिली रक्तस्राव झाला होतो आणि एक दिवसाचा अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **गाळा भाड्याने देणे आहे.** पी.एन.पी.मध्ये कलावती भाजी भंडारच्या बाजूला, अलिबाग संपर्क : ७३०४८५२३१५/९६०४१३८८२६
- **सन स्टोन रीयल इस्टेट,** साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. हाऊस कीपर, नाईट शिफ्ट हाऊस कीपर, वेटर ० ते २ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **नागावमधील हॉटेलमध्ये ऑलरॉऊंडर** कुक, कॅप्टन, वेटर आणि हाऊसकिपर इत्यादी कामासाठी माणसे पाहिजेत. (पार्ट टाईम काम सुद्धा मिळेल.) मो.९९२१९७८०८०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जंगले नष्ट होत असल्याने वनसंपत्तीचा होतोय ऱ्हास

# वणव्यांवरील नियंत्रणाला जनजागृतीची गरज

**। रायगड । प्रतिनिधी । जिल्ह्यात अधिकाधिक आदिवासी लोकवस्ती असून, ग्रामीण भागात ती विखुरली आहे. येथील नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. या भागात जंगल परिसर अधिक असल्याने हंगामानुसार उपलब्ध होणाऱ्या रानमेव्यापासून येथील नागरिक गुजराण करत असतात. मात्र, अचानक वणवे लागून जंगले नष्ट होत असल्याने वनसंपत्ती ऱ्हास होण्याच्या मार्गावर आहे.**

दरवर्षी डोंगर व जंगलात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर गवत, झाडेझुडपे, वेलवर्गीय वनस्पती उगवत असतात. पावसाळा संपल्यानंतर साधारणतः नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यांच्या दरम्यान या उगवलेल्या गवत व इतर वनस्पती वाळू लागतात. यादरम्यान डोंगर, जंगलातील मोठ्या झाडांचा वाळलेला पाला जमिनीवर पडलेला असतो.

याच वाळलेले गवत व इतर वनस्पती; तसेच पालापाचोळ्याला अनेकदा वणवे लावण्याचे प्रकार काहींकडून लावले जातात. अनेकदा गैरसमजुतीनेही वणवे लावले जातात. या वणव्यामध्ये अनेकदा संपूर्ण डोंगरच्या डोंगर, जंगले जळून खाक होऊन निसर्गाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होतो. यात वनसंपदा नष्ट होतात. अनेकदा पशू-पक्षी, वन्यप्राणी होरपळून निघतात. त्यामुळे वणवे नियंत्रणासाठी आत्तापासूनच वन विभागाकडून जनजागृती; तसेच वन वणवा याविषयी मार्गदर्शन करणाऱ्या कार्यशाळा घेण्याची गरज आहे, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.




गवत, पालापाचोळा जळून गेल्यामुळे पाऊस पडला तरी पावसाचे पाणी डोंगररांगांत साचले जात नाही. ते थेट नदीकडे वाहत असते. त्यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही. काही अंशी याचा परिणाम भूगर्भातील जलस्रोतांवर होत आहे.

गावागावांत निसर्गमित्र तयार करावेत. वणवा विषयावर पथनाट्य सादरीकरण व्हावे. जनजागृतीत शाळा, महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. वणवे नियंत्रणासाठी सामाजिक संस्थांना सोबत घ्यावे. वणव्याविषयीच्या ज्येष्ठांच्या गैरसमजुती दूर कराव्यात. शक्य असेल तेथे जाळपट्टे काढावेत.

> **जव्हार तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वणवे लागतात. वन विभागाकडून मोजक्याच ठिकाणी कारवाया केल्या जातात. मात्र, फक्त जनजागृती किंवा कारवाया करून वणवे नियंत्रित होणार नाहीत. यासाठी ज्या ग्राम पंचायत हद्दीत वणवे लागणार नाहीत, अशा ठिकाणी वन विभागाने बक्षिसे द्यावीत. वणवे लागणाऱ्या ग्रामपंचायत क्षेत्रांवर कारवाई करावी. यामुळे बऱ्यापैकी नियंत्रण मिळवता येईल.**
> **– चंद्रकांत बामणे, वन्यप्रेमी रामराज .**

# चायनिज ढाबे पोलिसांच्या रडारवर

## कारवाईच्या भीतीने ढाबेवाल्यांची घाबरगुंडी



**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

काटई-बदलापूर पाईपलाईनसह कल्याण-शिळ महामार्गावर ठिकठिकाणी बेकायदा थाटलेले चायनिज ढाबे पोलिसांच्या रडारवर आले आहेत. उत्पादन शुल्क विभागाची जबाबदारी असतानाही अशा चायनिजच्या ढाब्यांवर बिनबोभाट चालणाऱ्या दारूच्या अड्ड्यांवर कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे पोलिसांनी पुढाकार घेऊन पलाव्यातील कासारिओ भागात असलेल्या जय मल्हार चायनिज ढाब्यावर कारवाई केली. या कारवाईची खबर सर्वत्र पसरताच या भागातील बेकायदा ढाबेवाल्यांची घाबरगुंडी उडाली आहे.

या ढाब्यावर विनापरवाना मद्य विक्री करणाऱ्या चालकाच्या विरोधात मानपाडा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला आहे. कल्याण परिमंडळ ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या सूचनांनुसार कल्याण-डोंबिवलीतील बेकायदा धंद्यांच्या विरोधात आठही पोलिस ठाण्यांनी जोरदार मोहीम उघडली आहे. अजिनोमोटो नावाच्या घातक केमिकलचा चायनीजच्या कोणत्याही पदार्थांमध्ये सर्रास वापर केला जातो. या केमिकलच्या प्रादुर्भावामुळे हाडे ठिसूळ बनतात आणि कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला निमंत्रण मिळते. अशा चायनीजवाल्यांच्या विरोधात पोलिसांनी आक्रमक कारवाया सुरू केल्यामुळे कल्याण-डोंबिवलीकरांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संपत फडोळ, हवालदार विजय आव्हाड आणि गस्ती पथक रविवारी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान पलावा कासा रिओ भागात गस्त घालत होते. जय मल्हार चायनिज ढाब्यावर ग्राहकांना दारू पिण्यास मुभा दिली जात असल्याचे पोलिसांना आढळून आले. तेथील ग्राहक खुर्चीवर बसून टेबलावर ठेवलेले दारूचे पेग घशाखाली रिचवत बसले होते. पोलिसांनी ढाब्यात घुसून तेथील वेटर आणि ढाब्याचे प्रमुख शशिकांत कुंभार यांच्याकडे चायनिज ढाब्यात मद्य विक्री करण्यासाठी लागणाऱ्या परवान्याची विचारणा केली. असा परवाना आमच्याकडे नसल्याची माहिती कुंभार यांनी पोलिसांना दिली. परवाना नसताना ग्राहकांना बेकायदेशीरपणे मद्य पिण्यासाठी जागा उपलब्ध करून, तसेच विनापरवाना खाद्य पदार्थांची विक्री केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी चायनिज ढाब्याचे चालक शशिकांत कुंभार यांच्याविरोधात महाराष्ट्र प्रतिबंधित कायद्याने गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी अधिक चौकशीसाठी कुंभार यांना ताब्यात घेतले आहे. कुंभार हे पडले गाव जवळील नौपाडा गावचे रहिवासी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## तटरक्षक जवानांनी मच्छिमाराचा जीव वाचवला

**। डहाणू । वार्ताहर ।**

डहाणू तालुक्यातील खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या राधे कृष्णा या मासेमारी बोटीवरील एक मच्छीमार इंजिन रूममध्ये पडून गंभीर जखमी झाला होता. भारतीय तटरक्षक दलाने तातडीने बचावकार्यात सहभागी होत जखमी मच्छिमाराला रुग्णालयात दाखल केले आहे.

शनिवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता, डहाणू येथील तटरक्षक दलाच्या स्टेशनला, राधे कृष्णा मासेमारी बोटीवरील (रजि. क्र. आयएनडी-डीडी-०२-एमएम-१७०७) एका मच्छिमाराच्या जखमी झाल्याची माहिती मिळाली. ही बोट डहाणू खाडीच्या पश्चिमेला सुमारे ५ नॉटिकल मैल (९ किलोमीटर) अंतरावर होती. २२ नोव्हेंबर रोजी, इंजिन रूममध्ये पडल्याने जखमी मच्छिमाराच्या पोटाला गंभीर दुखापत झाली होती. तीव्र वेदनेमुळे त्याला हालचालही करता येत नव्हती. परिस्थितीच्या गांभीर्यामुळे बोटीवरील सदस्यांनी २३ नोव्हेंबर रोजी भारतीय तटरक्षक दलाशी संपर्क साधला. तटरक्षक दलाने तात्काळ आयसी-११८ इंटरसेप्टर क्राफ्ट बचाव कार्यासाठी पाठवली. अवघ्या ४० मिनिटांत, म्हणजे पावणे दोनच्या सुमारास, तटरक्षक दलाने राधे कृष्णा बोटीला गाठले. जखमी मच्छिमाराला सुरक्षितपणे इंजिन रूममधून बाहेर काढून आयसी-११८ क्राफ्टवर हलवले. प्रथमोपचार केल्यानंतर मच्छिमाराला डहाणू बंदरात नेण्यात आले. डहाणू बंदरावर पोहोचताच, जखमी मच्छिमाराला कॉटेज उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तटरक्षक दलाने मच्छिमाराच्या कुटुंबियांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. भारतीय तटरक्षक दलाने ही घटना सागरी सुरक्षेतील तातडीच्या प्रतिसादाचे उदाहरण ठरवले. समुद्रात आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी तात्काळ मदतीसाठी आणि सागरी सुरक्षेसाठी वचनबद्ध असल्याचे भारतीय तटरक्षक दलाकडून सांगण्यात आले. तटरक्षक दलाच्या वेगवान प्रतिसादामुळे जखमी मच्छिमाराचा जीव वाचला.

## वैभववाडीमध्ये दोन घरे फोडली

**। वैभववाडी । वार्ताहर ।**

वैभववाडी शहरातील दोन बंद घरे अज्ञात चोरट्यांनी फोडली. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. मात्र घर मालक मुंबईला असल्यामुळे पोलिसात तक्रार देण्यात आली नाही. शहरात भरवस्तीत दोन घरे फोडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वैभववाडी शहरात चोरट्यांकडून बंद घरांना टार्गेट केले जात आहे. शहरातील एका घरात तळमजल्यात दोन भाडोत्री राहतात. तर स्वतः मालक वरच्या मजल्यावर राहातात. घर मालक काही दिवसापूर्वी मुंबईला गेले आहेत. तर एक भाडोत्री शनिवारी संध्याकाळी मुंबईला गेले आहेत. याचा फायदा घेत चोरट्यांनी तळमजल्याची बंद खोली फोडली. खोलीतील कपाट फोडून कपाटातील साहित्य उसकटून टाकले. मात्र, त्यांच्या खोलीतील नेमके काय चोरीस गेले आहे हे समजू शकले नाही. तर प्रभाग क्र. १३ मध्येही एक बंद घर फोडले आहे. मात्र, या घरात चोरट्याच्या हाती काही लागले नाही. पोलिसांना माहिती मिळताच दोन्हीही घटनास्थळी पोलिसांनी भेट देऊन पाहणी केली आहे.

## रस्ता खड्ड्यात

**। अलिबाग । वार्ताहर ।**

तालुक्यातील गोंधळपाडा बस स्थानकापासून वरसोली फाट्यापर्यंतचा रस्त्याला ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरुन प्रवास करताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात येत आहे. तरी, संबंधित विभागाने या रस्त्याची तात्काळ डागडुजी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## नागरी सुविधा केंद्रात वृद्धाचा मृत्यू

**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयात सोमवारी दुपारी बाराच्या सुमारास दुर्दैवी घटना घडली. या कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रात कर भरणा करण्यासाठी आलेल्या एका ६७ वर्षीय वृद्धाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला.. श्रीकांत पुरूषोत्तम शेठ (६७) असे मृत वृद्धाचे नाव असून ते पूर्वेकडील मानपाडा रोडला असलेल्या अयोध्या नगरीतील राम सोसायटीत राहत होते. केडीएमसीचे डोंबिवली पूर्वेतील इंदिरा चौकात विभागीय कार्यालय आहे. नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर रखडलेली कामे करण्याकरिता नागरिकांची येथे गर्दी झाली होती..श्रीकांत शेठ हे पाणी बिल भरण्यासाठी आले होते. रांगेत उभे असताना श्रीकांत शेठ यांना अचानक चक्कर आल्याने ते बाकड्यावर बसले. मात्र काही वेळात ते बेशुद्धावस्थत गेले.

### जाहीर नोटीसीस हरकत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मे. शांती डेव्हलपर्स तर्फे भागिदार, १) श्री. दिपक राजपाल, २) श्री. जितेश कुमारयादव, कार्यालयीन पत्ता : ६अे/१, न्यु एक्सेलसियर सिनेमा बिल्डिंग, वॉलेस स्ट्रिट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांनी दैनिक कृषीवल या वर्तमानपत्राच्या ता. १९/११/२०२४ रोजीच्या अंकात मौजे गुंजीस येथील स. नं. ९/१/५/१ ते ९/१/५/१० व त्यामध्ये असलेल्या ग्रुपग्रामपंचायत बोरिस घर नं. १६१(१), १६१(२), १६१(३), १६१(४), १६१(५), १६१(९), १६१(१०), १६१(२०), १६१(२१), १६१(२२), १६१(२९), १६१(३०), १६१(३१) व १६१ (३४) या घर मिळकतीविषयी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस मी खाली सही करणार आय. टी. सेथुमाधवन, रा. ११-७०२, लोढा इटर्निस, को.ऑप.हा.सोसायटी, रोड नं. ११, एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व) ४०० ०१३ जाहीर हरकत कळवितो ती खालीलप्रमाणे :

१) ता. १९/११/२०२४ रोजीच्या दैनिक कृषीवलमध्ये प्रसिद्ध झालेली वर नमूद केलेली जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याकरीता मी शांती डेव्हलपर्स (पार्टनर्स दिपक राजपाल व जितेशकुमार यादव) यांस कोणतीही परवानगी अथवा संमती दिलेली नाही.

२) जाहीर नोटीसीत वर्णन केलेल्या मौजे गुंजीस स.नं.९/१/५/१ ते ९/१/५/१० या मिळकती मी मेसर्स शांती डेव्हलपर्स (पार्टनर्स ललित जी. सिंघवी (एच.यु.एफ.) व पियुष अशोक मेहता) यांस ता.२९/५/२००७ रोजीच्या रजिस्टर्ड डेव्हलपमेंट ॲग्रिमेंटद्वारे विकसन करण्याकरीता दिलेल्या होत्या व आहेत. त्याबदल्यात शांती डेव्हलपर्स यांनी मला पैशाच्या स्वरूपात मोबदला दिलेला आहे. डेव्हलपमेंट ॲग्रिमेंटनंतर शांती डेव्हलपर्स यांनी त्यामध्ये दोन इमारतीचे बांधकाम चालू केलेले होते. त्यापैकी एक इमारत पुर्ण झालेली असून त्यामध्ये ए.,बी.सी.अशा तीन विंग आहेत. त्यामधील निवासी सदनिका शांती डेव्हलपर्स यांनी वेगवेगळ्या इसमांस मालकी हक्काने विकत दिलेल्या आहेत. त्यांतील एक निवासी सदनिका मी विकत घेतली आहे. (ग्रुपग्रामपंचायत बोरिस-गुंजीस घर नं. १६१(१५). दुसऱ्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण आहे. त्यामुळे जमिन मिळकती जरी माझे नावावर मालक व भोगवटादार म्हणून असल्या तरीही त्यामध्ये शांती डेव्हलपर्स यांचा हक्कहितसंबंध १७ वर्षापुर्वीच निर्माण झालेला आहे. तसेच ग्रुपग्राम पंचायत बोरिस-गुंजीस घर नं.१६१(१५) ही निवासी सदनिका वगळता इतर सर्व सदनिका या निरनिराळ्या व्यक्तींच्या मालकीच्या असून त्या सदनिकांमध्ये माझा कोणताही हक्कहितसंबंध नाही. अशी परिस्थिती असल्यामुळे नोटीसीत वर्णन केलेल्या जमिन मिळकती व घर मिळकती या माझे मालकीच्या आहेत, असा भरवसा मी कुणालाही दिलेला नाही. त्याबाबतचे जाहीर नोटीसीमधील कथन धादांत खोटे व खोडसाळ आहे. सदर मिळकतींच्या खरेदी-विक्रीबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करणारे शांती डेव्हलपर्स (दिपक राजपाल व जितेशकुमार यादव) यांचेबरोबर मी नव्याने कोणताही लेखी करार केलेला नाही अथवा कोणतीही कागदपत्रे स्वाक्षरीत केलेली नाहीत. नोटीसीत वर्णन केलेल्या मिळकतींच्या मोबदल्यापोटी ता. २९/५/२००७ रोजीच्या डेव्हलपमेंट ॲग्रिमेंटच्या अनुषंगाने स्विकारलेल्या मोबदला रकमेव्यतिरिक्त मी कुणाकडूनही कोणतीही रक्कम स्विकारलेली नाही अथवा स्विकारण्याचे मान्य व कबूल केलेले नाही. सबब सदरची जाहीर नोटीस मागे घेण्याबाबत मी संबंधितांस लेखी कळविलेले आहे, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २६/११/२०२४

सही/-
**आय.टी.सेथू माधवन.**
११-७०२, लोढा इटर्निस, को.ऑप.हा.
सोसायटी, रोड नं.११, एम.आय.डी.सी.
अंधेरी (पूर्व) ४०००९३.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रनजितसिंग उधमसिंग संधू यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्र व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ८२/२/३ | एकुण क्षेत्र ०-३९-०० हे आर पॉ | ३-८० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २६/११/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की. आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सुधांशु पुरुषोत्तम पुरोहित यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे.मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७८/१ | एकुण क्षेत्र ०-२६-०० हे आर पॉ | २-०० |
| ७९/१ | एकुण क्षेत्र ०-६१-०० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-२३-०० हे आर पॉ | १०-८१ |
| ७९/४ | एकुण क्षेत्र ०-२५-०० हे आर पॉ | ४-५० |
| ७९/२/अ | एकुण क्षेत्र ०-६३-०० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-३६-०० हे आर पॉ | १३-०० |
| ८०/२ | एकुण क्षेत्र ०- ६६-०० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-५४-०० हे आर पॉ | ९-६३ |
| ८०/१/ब | एकुण क्षेत्र ०-३९-०० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-२८-०० हे आर पॉ | ३-१५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २६/११/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशिल १) श्री. राजेश चंद्रकांत मांडे रा.ठाणे यांनी खालील वर्णनाची मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकतीचे मालक श्री. अक्षय दिलीप देवलकर यांचेकडून कायमचे विकत घेण्याचे ठरविले असून त्या बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे- वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन-**

| सर्वे नं. | हिस्सा नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार रुपये/पैसे |
|---|---|---|---|
| १० | ८७ | ४-९४-२४ | ५०-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २५ नोव्हेंबर २०२४

अधिवक्ता
**ॲड. शुभांगी आनंद साळवी**
पत्ता- सरमोकादम बंगलो, गाळा नं २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
ता. कर्जत जि. रायगड, ४१०१०१
मो.नं. ९९६७८३४६१८/७७९६२०७३८०

### जाहीर नोटीस

आमच्या रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेस अलिबाग नगर परिषद हद्दीलगत असलेल्या ग्रामपंचायत हद्दीमध्ये संस्थेच्या कार्यालयाकरीता जमिन मिळकत ही खालील ठिकाणी खरेदी करावयाची आहे.

१. चेंढरे ग्रामपंचायत
२. वरसोली ग्रामपंचायत
३. वेश्वी ग्रामपंचायत
४. कुरुळ ग्रामपंचायत
५. नागांव ग्रामपंचायत

सदर जागे बाबतच्या पुर्व अटी
१. सदर जागा रस्ता सन्मुख असावी.
२. सदर जागा अ- कृषी (एन.ए.) असावी.
३. सदर जागेचा आराखडा मंजूर असावा. (ले-आउट)
४. सदर जागेचे स्थायित्व निर्वेध असावे.

या बाबतच्या प्राथमिक अटी पुर्ण करणाऱ्या जागेच्या मालकांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, सात दिवसाच्या आत खालील पत्यावर बंद लखोट्यात जमिनीच्या कागदपत्रांच्या झेरॉक्ससह व जमिनीच्या दरासह खालील पत्त्यावर पाठवावे.

एक अथवा संपुर्ण देकार नाकारणेचा अधिकार संस्था राखून ठेवत आहे. तसेच जागेचे स्थान व सोयी सुविधा चा विचार करुन दर निश्चित केला जाईल.

स्थळ
अलिबाग
दिनांक - २६/११/२०२४

संपर्क

सही/-
**श्री.सुदिन सुरेश कांबळे**
**ऑ. सेक्रेटरी**

सही/-
**श्री. कैलास गजानन चौलकर**
**चेअरमन**

रा.जि.प.कर्म.सह. पतपेढी लि.अलिबाग
पत्ता :- नटराज प्रिमायसेस, पी.एन.पी नगर,
रा.जि.म.सहकारी बँकेच्यावर, दुसरा मजला,
अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

### कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड अलिबाग

**कार्यकारी अभियंता, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड, ''वेदांत'' इमारत, रूम नं. ०१, तळ मजला, पंतनगर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. पिन - ४०१ २०१**

**office Tel :-०२१४१-२९९०५४ Email:- mh-rai@pmgsy.nic.in**

**निविदा सूचना क्रमांक १ व २/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड या कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचेसाठी एक वाहन व उप अभियंता (प्रमंग्रासयो), उप विभाग-माणगाव, अलिबाग, पनवेल महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड यांचेसाठी प्रत्येकी एक वाहन प्रतिमाह दराने भाड्याने घेणेकरिता सिलबंद निविदा मागवित आहोत. दि. २६.११.२०२४ पासून ते दि.०३.१२.२०२४ पर्यंत निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेची माहिती वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे. तसेच कोऱ्या निविदा फॉर्म वरील कार्यालयात उपलब्ध आहेत.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था**
**रायगड अलिबाग**

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे पोशिर, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.दत्तात्रय हरी शिंगटे व इतर | १४/३ | ००-७३-००<br>पो.ख. ००-२५-००<br>एकुण ००-९८-०० | ०-५४ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २५/११/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे, चौल ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमीन व त्याअंतर्गत असलेले घर मिळकत श्री. अविनाश यशवंत पाटील व श्री. अविरत अविनाश पाटील रुम नं. ३, जिवन महल, गोवंडी स्टेशन रोड, दैनिक मेडिकल समोर, गोवंडी- पूर्व, मुंबई यांच्या मालकीची असून, सदरील मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे. सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या वहिवाटीचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग जि.रायगड | १४ | बिनशेती २-५०-०० | २५.०० |

सदर वर नमूद जमिन बिनशेती जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणारे ग्रुप ग्रामपंचायत चौल मालमत्ता क्र. ६०० क्षेत्रफळ ७८४.०० चौ.फुट/चौ.मी. ही घर मिळकत नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक: २५/११/२०२४

सही/-
**(ॲड. वैभव वसंत पाटील )**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत सदरील मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. शशिकांत दत्तात्रेय लांजेकर, रा. ६ नवीन मणीभुवन, प्रार्थना समाज रोड, विले पार्ले (पु.), मुंबई-४०० ०५७ २) श्री. सुधीर पुरूषोत्तम लांजेकर,रा. फ्लॅट नं. २, तिरूपती अपार्टमेंट, पी. एम. रोड, विले पार्ले (पु.), मुंबई ४०० ०५७ ३) श्री. सुभाष मधुसूदन लांजेकर, रा. फ्लॅट नं. १०१, प्रभु आशिष सोसायटी, राम मंदिर रोड, विले पार्ले (पु.), मुंबई ४०० ०५७, ४) श्री. संदिप मधुसूदन लांजेकर, रा. फ्लॅट नं. १०१, प्रभु आशिष सोसायटी, राम मंदिर रोड, विले पार्ले (पु.), मुंबई ४०० ०५७, यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याचप्रमाणे उभयपक्षी साठेकरारनामा ता. १९/११/२०२४ रोजी स्वाक्षरीत झालेला आहे व आमच्या अशिलांनी सदरील व्यवहारापोटी बयाणा रक्कमही मिळकतीचे मालकांना अदा केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | गट नंबर | क्षेत्र हे. आर | पो.ख. हे. आर.. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे इंद्रपै, ता. अलिबाग, जि. रायगड. | ५० | ०-५४-३० | ०-०१-८० | ११.६९ |

व सदरील मिळकतीमध्ये स्थित ग्रामपंचायत आवास घर क्र. ५१, ५२ व ५३ ह्या घर मिळकती.
ज्यासी चतु:सिमा
पुर्वेस :- गट नं. ४६.
पश्चिमेस : गाव रस्ता.
उत्तरेस : गट नं. ४९, ५१ व ५३.
दक्षिणेस : गट नं. ६०.

तरी सदरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारणगहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २५/११/२०२४

**ॲड. जयेश अ. जोशी**
९३२, टिळक रोड, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, १. श्री. सुहास नंदकुमार साळुंखे, वय : ४२ वर्ष, पत्ता - संपदा बिल्डिंग, ब्लॉक नं. ०८, गणेश मंदिर समोर, झिराळ आळी, पेण, ता. पेण, जि. रायगड ४०२१०७, व २. श्री. समिर नंदकुमार साळुंखे, वय : ३९ वर्ष, पत्ता - बी-१/१७, प्रतीक नगर सोसायटी, सासणे नगर, इंडियन बँक समोर, हडपसर, पुणे शहर, ता. आणि पुणे ४११०२८, यांच्या खुद्दमालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहीवाटीतील बिनशेतजमिन मिळकत असून त्या बिनशेतजमिन मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे:-

**एकूण मिळकतीचे वर्णन**
**मौजे- नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| गाव | गट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव | १६२१ | २०.५०.०० | २०५.०० |
| | पैकी विक्रीचे क्षेत्र | १.५०.०० | १५.०० |

वरील बिनशेतजमिन मिळकत ही माझे अशिलांना वरील इसमांनी कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, या बिनशेतजमिन मिळकतीचा व्यवहार माझ्या अशिलांनी केला असून सदर व्यवहार हा वरील इसमांवर बंधनकारक आहे व सदर कराराची पूर्तता वरील इसमांनी करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर बिनशेतजमिन मिळकत विकण्यापूर्वी ती निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. जर सदरहू बिनशेतजमिन मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांसह (१५) पंधरा दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू बिनशेतजमिन मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, कळावे.

सही-
**ॲड. अभिमन्यू जाधव**
पत्ता- अपार्टमेंट क्र. पीएल६ए-४-३
खांदेश्वर अपार्टमेंट, सेक्टर ०१, खांदा कॉलनी,
न्यु पनवेल (प.), ता. पनवेल, जि. रायगड
दिनांक- २२/११/२०२४

**निवडक**

### अख्खा संघ ७ धावात तंबूत

**मुंबई :** नायजेरिया विरुद्ध आयव्हरी कोस्ट सामन्यात नायजेरियाने हा सामना २६४ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला.नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर नायजेरियाने आयव्हरी कोस्टविरुद्ध ४ गडी गमावून २७१ धावा केल्या. २७२ धावांच्या विशाल धावसंख्येचा पाठलाग करताना आयव्हरी कोस्टचा संघ १० षटकेही क्रीझवर टिकू शकला नाही. आयव्हरी कोस्टचा संपूर्ण संघ ७.३ षटकांत केवळ ७ धावांवर गडगडला.

### बटलर गुजरातच्या ताफ्यात

**मुंबई :** आयपीएलमधील पदार्पणाच्या हंगामातच जेतेपद पटकावणारा संघ म्हणून गुजरात टायटन्सने आपली ओळख तयार केली आहे. पाच खेळाडूंना रिटेन करणाऱ्या गुजरातने लिलावात दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आणि इंग्लंडचा कर्णधार जोस बटलर यांना ताफ्यात समाविष्ट केलं. व्यवस्थित अभ्यास करुन लिलावात उतरणारा संघ ही ओळख गुजरातने या लिलावातही कायम राखली. संघाकडे एक राईट टू मॅच कार्डही उपलब्ध आहे.

### बंगळुरूच्या डावपेचांवर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या लिलावातील डावपेचांवर चाहत्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत जोरदार ट्रोलिंग केलं आहे. सोशल मीडियावर असंख्य मीम्स फिरत आहेत. बंगळुरू संघाने ऋषभ पंत, के.एल.राहुल आणि श्रेयस अय्यर या खेळाडूंसाठी प्रयत्न केले पण त्यांना यश मिळालं नाही. त्यामुळे आगामी हंगामात त्यांचा कर्णधार कोण हा प्रश्न कायम आहे. विराट कोहली संघात आहे मात्र त्याचं वय आणि भविष्याचा विचार करता बंगळुरूला नवा कर्णधार हवा आहे.

### जोफ्रा आर्चर राजस्थानमध्ये

**मुंबई :** लिलावाच्या पहिल्या टप्प्यात निवांत असणाऱ्या राजस्थान रॉयल्सने उत्तरार्धात वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला ताफ्यात समाविष्ट केलं आहे. जोफ्रा याआधीही राजस्थानकडून खेळला आहे. जोफ्राच्या सहभागाविषयी अनिश्चितता होती. मात्र लिलावाच्या आधी काही तास जोफ्राला इंग्लंड क्रिकेट बोर्डाकडून हिरवा कंदील मिळाला आणि त्याचं नाव समाविष्ट करण्यात आलं.राजस्थानने प्रमुख गोलंदाजांना सोडलं होतं. त्यामुळे आर्चरच्या रुपात त्यांनी मोठं नाव संघात समाविष्ट केलं आहे.

### १० षटकांच्या सामन्यात शतक

**मुंबई :** अबू धाबी टी १० लीग म्हणजेच प्रत्येकी १० षटकांच्या सामन्यात शतक झळकावण्याची करामत शेरफन रुदरफोर्डने केली. अबू धाबी इथे झालेल्या लढतीत नॉर्दन वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करताना १४२ धावांची मजल मारली. १४२ पैकी १०३ धावा शेरफनच्या होत्या. शेरफनने ७ चौकार आणि १० षटकारांसह ४० चेंडूत १०३ धावांची अविश्वसनीय खेळी केली. शेरफनने ९ वनडे आणि २८ टी २० सामन्यात वेस्ट इंडिजचं प्रतिनिधित्व केलं आहे.

# भारताने भेदलं पर्थचं चक्रव्यूह!

## ऑस्ट्रेलियाला दिले 534 धावांचे लक्ष्य

## ऑस्ट्रेलियावर मिळवला ऐतिहासिक कसोटी विजय



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील पहिल्याच कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा दारूण पराभव केला आहे. पर्थच्या अभेद्य बालेकिल्ल्यात भारताने ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी मोठा ऐतिहासिक विजय मिळवला आहे. यशस्वी जैस्वालच्या १६१ धावा आणि विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाला विजयसाठी ५३३ धावांचे लक्ष्य देत डाव घोषित केला होता. पहिल्या डावात १५० धावांवर सर्वबाद झाल्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी ऐतिहासिक पुनरागमनात मोठी भूमिका बजावली. भारतीय संघाने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीची ऐतिहासिक विजयाने सुरूवात केली आहे. जसप्रीत बुमराह, यशस्वी जैस्वाल भारताच्या विजयाचे शिल्पकार ठरले.

जसप्रीत बुमराहने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण भारताला पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाच्या भेदक गोलंदाजीसमोर फार धावा करता आल्या नाहीत आणि टीम इंडिया १५० धावा करत सर्वबाद झाली. यानंतर भारताच्या गोलंदाजांनी तर कहर केला. १५० धावांच्या आघाडीसह गोलंदाजी करताना भारताच्या गोलंदाजांनी कांगारू संघाच्या फलंदाजांना फार काळ मैदानावर टिकू दिले नाही. सुरूवातीच्या षटकांमध्ये जसप्रीत बुमराहने भेदक गोलंदाजी करत झटपट ३ विकेट्स गमावले. यानंतर सिराज, हर्षित राणाने बुमराहला साथ देत कांगारू फलंदाजीचे कंबरडे मोडले.पहिल्या डावात भारताकडून जसप्रीत बुमराहने ५ विकेट्स घेतले. तर पदार्पणवीर हर्षित राणाने ट्रेव्हिस हेडला क्लीन बोल्ड करत त्याची पहिली आंतरराष्ट्रीय कसोटी विकेट मिळवली, यासह त्याने पहिल्याच सामन्यात ३ विकेट्स मिळवल्या. तर सिराजने २ विकेट्स आपल्या नावे केला. भारतीय संघ पहिल्या डावातील ४६ धावांच्या आघाडीसह फलंदाजी करण्यासाठी उतरला. दुसऱ्या डावात तर भारताच्या सलामीवीरांनी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांना विकेट्ससाठी तंगवलं. केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालने २०१ धावांची ऑस्ट्रेलियामध्ये भारताकडून सर्वात मोठी भागीदारी रचत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. यशस्वी जैस्वालने पहिल्याच ऑस्ट्रेलिया कसोटीतील पहिल्या कसोटीत शतक झळकावत इतिहास घडवला. यशस्वीने १६१ धावांची तर राहुल ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तर त्यानंतर ऑस्ट्रेलियासाठी कायमचं कर्दनकाळ ठरलेल्या विराट कोहलीने आपल्या पुनरागमनाचा डंका वाजवत १४३ चेंडूत वादळी शतक झळकावले. भारतीय संघ ऑस्ट्रेलियाच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच पर्थच्या स्टेडिमयवर ऑस्ट्रेलियाला पराभूत करणारा पहिला संघ ठरला आहे.

**६ व्या बँडी नॅशनल स्पर्धा**

# श्रुती गायकरला चौथ्यांदा सुवर्णपदक



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र संघातील श्रुती दत्ताराम गायकर या बँडी राष्ट्रीय खेळाडूने तामिळनाडू येथे झालेल्या ६ व्या बँडी नॅशनल स्पर्धेत वयोगट १६ वरील गटात प्रथम क्रमांक पटकावला. बेणसे गावची रहिवाशी असलेल्या श्रुती गायकरने या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून गाव, जिल्हा व राज्याचे नावलौकिक केले आहे. तिच्या या यशाबद्दल विविध स्थरातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशानंतर श्रुती गायकर या खेळाडूला आगामी खेलो इंडिया सामन्यांमध्ये निवड होण्याची सर्वोत्तम गोलकीपर म्हणून संधी मिळाली आहे. सदरची स्पर्धा प्रशिक्षक संजय गमरे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळली.

सततचा सराव, अथक व नियमित परिश्रम, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, कुटुंबियांचा पाठिंबा यामुळेच हे यश संपादन केले असल्याची प्रतिक्रिया श्रुतीने दिली आहे.

# श्रेयस अय्यर, अर्शदीप सिंगसाठी पंजाब किंग्जने रिती केली तिजोरी



**। पंजाब । वृत्तसंस्था ।**

आयपीएल स्पर्धेचे सर्व हंगाम खेळूनही जेतेपद पटकावू न शकलेल्या पंजाब किंग्जने लिलावात नव्याने संघबांधणी करायला घेतली आहे. रिटेन्शनमध्ये केवळ दोन खेळाडूंना रिटेन करणाऱ्या पंजाब किंग्जने लिलावात श्रेयस अय्यरसाठी तब्बल २६.७५ कोटींची बोली लावली. पंजाबला एका सक्षम कर्णधाराची गरज होती. श्रेयसच्या रुपात त्यांना चांगला कर्णधार मिळाला आहे. पंजाबने अर्शदीप सिंगसाठी राईट टू मॅचचा अधिकार वापरत त्याला ताफ्यात समाविष्ट केलं. पंजाबने अटीतटीच्या मुकाबल्यात फिरकीपटू युझवेंद्र चहलला सामील केलं. चहलसाठी पंजाबने तब्बल १८ कोटी रुपये मोजले.

डावखुरा वेगवान गोलंदाज या दुर्मीळ गटाचा प्रतिनिधी असलेल्या टी २० वर्ल्डकप विजेत्या अर्शदीप सिंगसाठी पंजाब किंग्जने राईट टू मॅचचा अधिकार वापरला. लिलावात सलामी करणाऱ्या अर्शदीप सिंगसाठी जोरदार लढाई रंगली. सनरायझर्स हैदराबादने १५ कोटींची बोली लावली. पंजाब किंग्जने राईट टू मॅचचा अधिकार वापरू असं स्पष्ट केलं.

अर्शदीप सिंगसाठी १८ कोटी देणार तयार असल्याचं पंजाबने स्पष्ट केलं आणि त्याची घरवापसी पक्की झाली. लिलावापूर्वी झालेल्या रिटेन्शनमध्ये पंजाब संघाने अर्शदीपला रिलीज केलं होतं. विकेट्स पटकावण्यात आणि धावा रोखण्यात माहीर अर्शदीपसाठी जोरदार बोली लागणार हे स्वाभाविक होतं. तसंच झालं. पंजाब दा पुत्तर अर्शदीपला संघात सामील करत पंजाबने आपला गोलंदाजीचा प्रमुख तोच असेल हे सिद्ध केलं.

पंजाबने माजी कर्णधार ग्लेन मॅक्सवेलला संघात घेतलं आहे. अष्टपैलू मॅक्सवेलला सूर गवसल्यास पंजाबचं नशीब पालटू शकतं. नवीन प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग यांच्या पुढाकारामुळे पंजाबने अष्टपैलू मार्कस स्टॉइनसला संघात समाविष्ट केलं आहे.

विदर्भवीर अष्टपैलू खेळाडू यश ठाकूर लखनौकडून पंजाबच्या गटात आला आहे. मुंबईसाठी दमदार कामगिरी करणाऱ्या नेहल वढेराला पंजाबने आपल्याकडे ओढून घेतलं आहे.

नवा हंगाम नवे खेळाडू नवा कर्णधार आणि नवे प्रशिक्षक असं काम चालणारा संघ म्हणजे पंजाब किंग्सचा संघ. पंजाब किंग्सचा संघ आयपीएल २०२५ पूर्वी नव्याने संघ बांधणी करणार आहे. पंजाबने रिटेन केलेल्या खेळाडूंमध्ये फक्त दोन खेळाडूंचा समावेश आहे. त्यामध्ये शशांक सिंग याला ५.५ कोटी आणि प्रभसिमरन सिंगला ४ कोटींना संघात कायम ठेवलं आहे. गेल्या काही हंगामात शिखर धवनने पंजाबचं नेतृत्व केलं. मात्र धवनने निवृत्तीचा निर्णय घेतल्यानंतर पंजाब संघाला कर्णधारापासून सुरुवात करावी लागणार आहे. शेवटच्या लिलावात पंजाबाने सॅम करनसाठी तिजोरी रीती केली होती. सॅम करनने धवनला दुखापत झालेली असताना संघाचे नेतृत्वही केलं, पण त्याच्या लौकिकाला साधेचा त्याला खेळ करता आला नाही.

पंजाब किंग्सने या हंगामापूर्वी रिकी पॉंटिंगला संघाचा नवा प्रशिक्षक म्हणून नेमलं आहे. आयपीएल २०२५ च्या लिलावात पंजाबचा संघ रिकी पॉंटिंगच्या मार्गदर्शनाखाली नव्याने संघ तयार करणार आहे. पंजाब किंग्सचा संघ २०२५ च्या लिलावात १२० कोटींपैकी ११०.०५ कोटी अशा सर्वाधिक पर्ससह लिलावात उतरणार आहे. पंजाब संघाने दोनच खेळाडूंना रिटेन केल्यामुळे त्यांच्याकडे चार राईट टू मॅच कार्ड उपलब्ध आहेत.

पंजाबच्या संघात हर्षल पटेल आणि सध्या टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक क्रिकेट घेणारा भारताचा वेगवान गोलंदाज असलेला अर्शदीप सिंगदेखील होता. त्यामुळे कदाचित संघ या दोन्ही वेगवान गोलंदाजांसाठी राईट टू मॅच कार्डचा वापर करेल.

# सनरायझर्स हैदराबादने उभारला संतुलित संघ



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पॅट कमिन्सच्या नेतृत्वात आक्रमक पवित्र्यासह खेळणाऱ्या सनरायझर्स हैदराबादने लिलावात चांगल्या खेळाडूंची निवड करत उत्तम संघ उभारला. युवा विकेटकीपर फलंदाज इशान किशनला हैदराबादने संघात घेतलं. दुसरीकडे त्यांनी अनुभवी मोहम्मद शमीला ताफ्यात घेतलं. शमीला साहाय्य करण्यासाठी हर्षल पटेलला समाविष्ट केलं. अभिनव मनोहरला घेण्यासाठी हैदराबाद संघव्यवस्थापन आतूर होतं. चुरशीच्या मुकाबल्यात हैदराबादने बाजी मारली. राहुल चहर या हुशार फिरकीपटूला त्यांनी आपल्याकडे वळवलं.

सनरायझर्स हैदराबाद संघाने आयपीएल २०२४ मध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारत सर्वांचे लक्ष वेधून घेतलं. २०२४ मध्ये कर्णधार पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली सनरायझर्स हैदराबादने आक्रमक पवित्राने खेळत उत्कृष्ट कामगिरी केली.

ट्रॅव्हिस हेड, हेनरिक क्लासेन आणि अभिषेक शर्मा यांनी तर अक्षरशः गोलंदाजांची बेदम धुलाई केली. हैदराबाद संघानेही आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी याच ५ खेळाडूंना रिटेन केलं आहे. जागतिक क्रिकेटमधील तीन विस्फोटक फलंदाज आणि एक उत्कृष्ट वेगवान गोलंदाज असताना आता हैदराबादचा संघ मधली फळी अधिक मजबूत करण्यासाठी लिलावात बोली लावणार आहे.

खेळाडूंसाठी प्रचंड बोली लावण्यासाठी हैदराबादच्या सहमालक काव्या मारन प्रसिद्ध आहेत. रविवारीही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत हैदराबादला चांगला संघ उभारुन दिला. हैदराबादच्या टेबलवर डॅनियल व्हेटोरी आणि मुथय्या मुरलीधरन हे जागतिक दर्जाचे फिरकीपटू प्रशिक्षकाच्या रुपात उपस्थित होते.

सनराइजर्स हैदराबाद संघाने रिटेन केलेल्या खेळाडूंमध्ये हेनरिक क्लासेनला आयपीएल २०२५च्या रिटेन्शनमधील २३ कोटी ही सर्वात मोठी रक्कम दिली. तर पॅट कमिन्सला १८ कोटी, ट्रॅव्हिस हेडला १४ कोटी, अभिषेक शर्माला १४ कोटी आणि नितेश कुमार रेड्डीला ६ कोटी देत संघाने कायम ठेवलं. रिटेन्शननंतर हैदराबाद संघाकडे १२० कोटींपैकी ४५ कोटी इतकी रक्कम शिल्लक आहे. संघाकडे एक राईट टू मॅच कार्ड देखील उपलब्ध आहे.

तुफान फटकेबाजी करणारं त्रिकूट, उत्कृष्ट नेतृत्व आणि मजबूत फलंदाजी फळी असतानाही हैदराबादला केकेआरविरूद्ध आयपीएल २०२४ च्या अंतिम सामन्यात मोठी धावसंख्या उभारता आली नाही आणि कोलकत्ता संघाविरुद्ध त्यांना लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे आगामी आयपीएल स्पर्धेचे जेतेपद जिंकण्याचे संघाचे लक्ष्य असेल. हैदराबादच्या ताब्यात अनेक उत्कृष्ट खेळाडू होते.

# पाकिस्तानला झिम्बाब्वेचा दणका



**। झिम्बाब्वे । वृत्तसंस्था ।**

अंतर्गत बंडाळ्या आणि खराब कामगिरीच्या गर्तेत सापडलेल्या पाकिस्तानला रविवारी आणखी एक धक्का बसला. ऑस्ट्रेलियाहून झिम्बाब्वे दौऱ्यावर गेलेल्या पाकिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला. बुलावेयो इथे झालेल्या पहिल्या वनडेत झिम्बाब्वेने पाकिस्तानवर ८० धावांनी खणखणीत विजय मिळवला.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. नवव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या रिचर्ड नकाराग्वाने ४८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. अनुभवी सिकंदर रझाने ६ चौकारांसह ३९ धावांची खेळी केली. बाकी खेळाडूंना मोठी खेळी करण्यात अपयश आलं. पाकिस्तानतर्फे सलमान अघा आणि फैझल अक्रम यांनी प्रत्येकी ३ विकेट्स पटकावल्या. आमीर जमाल, मोहम्मद हसनैन, हारिस रौफ यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.झिम्बाब्वेच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर पाकिस्तानने शरणागती पत्करली.

# मुंबई इंडियन्सची ‘बोल्ट’ खरेदी



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबई इंडियन्सने लिलावाच्या पहिल्या टप्प्यात मूक साक्षीदार म्हणून राहणं पसंत केलं. पण दुसऱ्या टप्प्यात त्यांनी नेहमीच्या खाक्याला जागत ट्रेंट बोल्टच्या रुपात डावखुरा वेगवान गोलंदाज ताफ्यात सामील केला. बोल्टसाठी मुंबईला १२.५० कोटी रुपये मोजावे लागले. काही वर्षांपूर्वी बोल्ट मुंबईकडेच होता. वानखेडेवर बुमराह आणि बोल्ट यांना पाहणं ही चाहत्यांसाठी पर्वणी असेल. दरम्यान गेल्या हंगामात त्यांच्याकडेच असणाऱ्या नमन धीरसाठी मुंबईने ५.२५ कोटी रुपये मोजले.

मुंबई संघाने आयपीएलपूर्वी संघातील पाच मुख्य खेळाडूंना रिटेन केलं. यामध्ये कर्णधार हार्दिक पंड्या, रोहित शर्मा, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमराह यांचा समावेश आहे. मुंबई संघाने सर्वोत्कृष्ट जसप्रीत बुमराहला १८ कोटी अशा सर्वाधिक किंमत देत संघात कायम ठेवलं आहे. यंदाच्या आयपीएल लिलावात मुंबईचा संघ यष्टीरक्षक आणि गोलंदाजांची निवड करणार आहे.

आयपीएल २०२५ रिटेन्शनच्या नियमानुसार मुंबई इंडियन्सने पाच खेळाडूंना संघात कायम ठेवले. ज्यामध्ये जसप्रीत बुमराहला १८ कोटी सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या यांना प्रत्येकी १६.३५ कोटी रोहित शर्माला १६.३० कोटी आणि तिलक वर्माला ८ कोटी रुपयांसह रिटेन केलं. रिटेन्शननंतर मुंबई संघाकडे १२० कोटींपैकी ५५ कोटींसह लिलावात उतरणार आहे.

**बुद्धिबळ जगज्जेतेपदाची लढत सिंगापूरमध्ये । गुकेशला सर्वांत युवा जगज्जेता बनण्याची संधी**

# गुकेशच्या स्वप्नपूर्तीच्या मार्गात डिंग लिरेनचा अडथळा!



**लढतीचे स्वरूप**

जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीत एकूण १४ पारंपरिक (क्लासिकल) डाव होतील. सर्वप्रथम ७.५ गुणांचा टप्पा गाठणारा खेळाडू विजेता ठरेल आणि जगज्जेतेपद मिळवेल.

**। सिंगापूर । वृत्तसंस्था ।**

एकीकडे गेल्या काही वर्षांपासून सातत्याने आपल्या खेळाचा स्तर उंचावणारा भारताचा दोम्माराजू गुकेश, तर दुसरीकडे गतवर्षी जगज्जेतेपद मिळवल्यानंतर लय गमावून बसलेला चीनचा डिंग लिरेन. या दोन गुणवान बुद्धिबळपटूंमधील जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीला सिंगापूर येथे सुरुवात होणार आहे. १८ वर्षीय गुकेशला सर्वांत युवा जगज्जेता म्हणून इतिहास घडविण्याची संधी आहे. मात्र, त्यासाठी आपल्याला सर्वोत्तम खेळच करावा लागणार आहे.

डिंगने गतवर्षी रशियाच्या इयन नेपोम्नियाशीला पराभूत करून बुद्धिबळविश्वातील पहिला चिनी जगज्जेता म्हणून मिरवण्याचा मान मिळवला होता. मात्र, त्यानंतर त्याची कामगिरी खालावली आहे. तसेच त्याला नैराश्यालाही सामोरे जावे लागले. त्यामुळे यंदाच्या लढतीत गुकेशचे पारडे जड असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे. भारताकडून आतापर्यंत केवळ विश्वनाथन आनंदने जगज्जेतेपदावर मोहोर उमटवली आहे. गेल्या काही वर्षांपासून आनंदच्या मार्गदर्शनाखालीच गुकेश सराव करत आहे. त्यामुळे आपल्या गुरुच्या पावलावर पाऊल ठेवण्याची संधी गुकेशकडे आहे.

स्पर्धा जितकी मोठी, तितका गुकेशचा खेळ बहरतो असे म्हटले जाते. याचाच प्रत्यय २०२२ आणि २०२४ च्या ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये, तसेच या वर्षीच्या कँडिडेट्स स्पर्धेत आला होता. ऑलिम्पियाडमध्ये गुकेशने दोन वेळा वैयक्तिक सुवर्णपदकाची कमाई केली, तर कॅनडा येथे झालेल्या कँडिडेट्स स्पर्धेत त्याने मातब्बरांना मागे टाकत जेतेपद पटकावले आणि जगज्जेतेपदाच्या लढतीसाठी तो सर्वांत युवा आव्हानवीर ठरला. गुकेशविरुद्ध खेळणे सोपे नसणार हे डिंगला ठाऊक आहे.

गुकेश खूप युवा आहे, पण त्याचा खेळ परिपक्व आहे. त्याने विविध स्पर्धांतून आपला दर्जा सिद्ध केला आहे. आम्ही दोघेही आपापली सर्वोत्तम कामगिरी करू शकलो तर ही लढत चुरशीची होईल,असे पत्रकार परिषदेत डिंग म्हणाला. त्याच वेळी गुकेशनेही विद्यमान जगज्जेत्याला आदर दिला. डिंगची गुणवत्ता मला ठाऊक आहे. त्याला कमी लेखण्याची चूक मी निश्चितपणे करणार नाही, असे गुकेशने नमूद केले होते.

पाच वेळच्या विश्वविजेत्या आनंदला २०१३ मध्ये जगज्जेतेपदाच्या लढतीत मॅग्नस कार्लसनकडून हार पत्करावी लागली होती. त्यामुळे आता दशकभराहूनही अधिक कालावधीपासून भारताचा जागतिक अजिंक्यपदाचा दुष्काळ संपविण्याची गुकेशकडे संधी आहे. तब्बल १३८ वर्षांनंतर दोन आशियाई बुद्धिबळपटू जगज्जेतेपदाच्या लढतीत एकमेकांसमोर येणार आहे. यात गुकेशची जगज्जेतेपदाची स्वप्नपूर्ती होणार की डिंगच सरस ठरणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. पहिल्या ४० चालींसाठी १२० मिनिटे, पुढील २० चालींसाठी ६० मिनिटे आणि उर्वरित चालींसाठी १५ मिनिटांचा कालावधी खेळाडूंना उपलब्ध असेल. काळ्या मोहऱ्यांनी खेळाडूच्या ४० चाली होत नाहीत, तोवर सामना बरोबरीत सोडवता येणार नाही. तसेच १४ डावांअंती लढतीत बरोबरी असल्यास विजेता ठरवण्यासाठी जलद प्रकारात टायब्रेकर खेळवण्यात येईल. पहिल्या डावात गुकेशला पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधी मिळणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)